• वर्ष : ०४ • अंक : ०११ • पुणे • रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





## थोडक्यात पण महत्वाचे



### आत्महत्या प्रतिबंधक गेटकीपर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH), पुणे यांच्या वतीने जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन २०२६ निमित्त एक दिवसीय आत्महत्या प्रतिबंधक गेटकीपर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मानसिक आरोग्य, आत्महत्येची प्रवृत्ती आणि आत्महत्या प्रतिबंध याबाबत जनजागृती वाढविणे, तसेच मानसिक तणाव व भावनिक अडचणी ओळखून योग्य वेळी मदत मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकणाऱ्या व्यक्तींची क्षमता विकसित करणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. प्रसाद देशपांडे, संचालक–प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (MIMH) यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. श्रीकांत पवार, मुख्य प्रशासकीय अधिकारी, संस्थेतील प्राध्यापकवर्ग तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक डॉ. प्रफुल्ल कापसे यांनी प्रमुख प्रशिक्षक श्री. सचिन चितांबरन, संस्थापक संचालक, The Connect Hut – मानसिक आरोग्य विषय सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा पद्धतीने मांडण्यासाठी कार्यरत सामाजिक उपक्रम – यांचा परिचय करून दिला.



### पुणे वाहतुक कोंडीच्या संकटात

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक शहरांशी स्पर्धा करणाऱ्या पुणे शहराचे शहरीकरण अस्ताव्यस्त आणि विकास नियोजन शून्य झाला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक प्राथमिक गरजांसाठी आजही झगडत आहे . दिवसेंदिवस या समस्या अधिकच वाढत आहे. दिशाहीन नियोजनामुळे हे शहर बकाल झाले असून वेळीच यासंदर्भात उपाययोजना केल्या नाहीत तर हे शहर राहण्यायोग्यही असणार नाही, आणि यासाठी पुढील पिढी मात्र आपल्याला माफ करणार नाही अशी भावना वास्तु विशारद , नगर रचनाकार आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली. पुणे महानगराचा विकास सुनियोजित पद्धतीने आणि नगर नियोजन विभागाच्या निर्देशानुसार, टीपी व डीपी नुसार होत आहे का(?) याचा मागोवा घेणाऱ्या परिसंवादाचे आयोजन 'राजीव गांधी स्मारक समितीच्या' वतीने करण्यात आले.



### 'ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026' ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : परदेशात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी स्मार्ट'च्या वतीने आयोजित 'ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026'ला पुण्यातील बोट क्लब येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या फेअरमध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि दुबई येथील सुमारे 60 हून अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परदेशी शिक्षणासंदर्भातील विविध पर्यायांची माहिती घेतली. विशेष म्हणजे, या ठिकाणी विद्यार्थ्यांना आणि पालकांना पूर्णपणे मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. परदेशात शिक्षण घेण्याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात—योग्य देश व विद्यापीठाची निवड, शैक्षणिक कर्जाची प्रक्रिया, उपलब्ध शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) तसेच प्रवेश प्रक्रिया यासारख्या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन या फेअरमध्ये करण्यात आले. त्यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान झाले.

### भारतातील RWA टोकनायझेशनसाठी 'The Box' लॉन्च केले



मुंबई (आरंभ पर्व) : RealX आणि MST Blockchain यांनी Liminalच्या भागीदारीत आज 'The Box' हे स्वदेशी इन्फ्रास्ट्रक्चर स्टॅक लॉन्च केले. भारतात रिअल-वर्ल्ड ॲसेट्स (RWA)चे नियमन व अनुपालनाच्या चौकटीत टोकनायझेशन सक्षम करणे हा यामागील उद्देश आहे. World Trade Centre Mumbai हे या उपक्रमाचे इकोसिस्टम पार्टनर आहे. या लॉन्चद्वारे RealXचे REDbox आणि Whitebox सादर करण्यात आले असून, हे दोन्ही प्लॅटफॉर्म MST Blockchainच्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत. भारतीय पायाभूत व्यवस्थेवर टोकनाइज्ड ॲसेट प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी आवश्यक कायदेशीर, मार्केटप्लेस आणि ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर एकत्र आणण्याचे काम ते करतात. RealXचे REDbox हे Platform-as-a-Service (PaaS) सोल्यूशन असून, त्याद्वारे रिअल इस्टेट डेव्हलपर्सना स्वतःच्या ब्रँड, वेबसाइट आणि ग्राहक माध्यमांद्वारे टोकनाइज्ड प्रॉपर्टी ऑफरिंग लॉन्च करता येतील. तर Whitebox हे ओपन-आर्किटेक्चर इन्फ्रास्ट्रक्चर लेयर आहे. याच्या माध्यमातून स्टार्टअप्स, कॉर्पोरेट्स आणि ॲसेट व्यवसायांना स्वतःच्या ब्रँडखाली RWA टोकनायझेशन प्लॅटफॉर्म उभारता येतील. दोन्ही प्लॅटफॉर्म MST Blockchainद्वारे संचालित आहेत. MST Blockchain हे एंटरप्राइज-रेडी भारतीय Layer-1 ब्लॉकचेन असून, सुरक्षित, स्केलेबल आणि ऑडिट करता येण्याजोग्या डिजिटल प्रणालींसाठी आवश्यक डिस्ट्रिब्युटेड लेजर इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून देते. RealX कायदेशीररीत्या अंमलात आणता येतील अशा डिजिटल ॲसेट्सच्या निर्मितीसाठी कायदेशीर आणि अनुपालन चौकट उपलब्ध करून देते. या इन्फ्रास्ट्रक्चरला भारतातील उदयोन्मुख RWA अर्थव्यवस्थेसाठी खुले आणि स्वदेशी व्यासपीठ म्हणून विकसित करण्याचा कंपन्यांचा उद्देश आहे. यामुळे डेव्हलपर्स आणि उद्योजकांना परदेशी प्लॅटफॉर्म किंवा तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता टोकनायझेशन आधारित व्यवसाय उभारता येणार आहेत.

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

## सातव्यांदा एकमताने निवड




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची सातव्यांदा एकमुखाने निवड करण्यात आली. संस्थेच्या प्रगतीची धुरा गेल्या पंचवीस वर्षांपासून समर्थपणे सांभाळणाऱ्या ॲड. बुट्टे पाटील यांच्या नेतृत्वावर सभासदांनी पुन्हा एकदा विश्वासाने शिक्कामोर्तब केले आहे.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील हे सन २००१ पासून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. पुढील पंचवार्षिक कालावधीसाठीही त्यांची अध्यक्षपदी एकमुखाने निवड झाल्याने सभासदांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आमदार बाबाजी काळे, जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे, अनिल राक्षे, एस.पी.देशमुख, दशरथ ढोबळे यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्ष निवडीचा ठराव प्रकाश पाचारणे यांनी मांडला तर अनुमोदन माणिक भांबुरे यांनी दिले. यावेळी संस्था कार्यकारिणी निवडण्याचे अधिकार अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांना देण्यात आले. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आमदार बाबाजी काळे यांनी सर्व सभासदांच्या वतीने ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांचे अभिनंदन केले. मनोगत व्यक्त करताना त्यांनी खेड तालुक्याच्या शैक्षणिक विकासासाठी संस्थेला सहकार्य करण्याची आपली भूमिका स्पष्ट केली. सीएसआर फंडाच्या माध्यमातून संस्थेच्या नवीन महाविद्यालयासाठी इमारत उभारण्यासाठी प्रयत्न करणार असून, खेड तालुक्याला संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून आणण्यासाठीही प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्निवडीबद्दल सभासदांचे आभार मानताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सभासदांनी व्यक्त केलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेच्या विकासाची वाटचाल अधिक व्यापक करताना सर्व सभासद, संस्थेची सर्व महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकेतर सेवकांना सोबत घेऊन संस्थेचा कारभार पारदर्शक पद्धतीने पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. बदलत्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नर्सिंग कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सभेचे अहवालवाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

# गिर्यारोहक सुविधा कडलक यांना क्रीडा गौरव पुरस्कार प्रदान



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशन संस्थेचा वर्धापन दिन संस्थेच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा साजरा करून उत्साहात संपन्न झाला. यावेळी खेड तालुक्यातील प्रथम महिला माउंट एवरेस्ट गिर्यारोहक सुविधा कडलक यांना 'हुतात्मा राजगुरू क्रीडा गौरव पुरस्कार' देण्यात आला.

तसेच अनंत तायडे यांना महाराष्ट्र शासन वनश्री पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वृक्ष लागवड व संवर्धन या कार्याबद्दल तसेच खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष मधुकर खेडकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चैतन्य संस्थेच्या संस्थापिका सुधा कोठारी तर प्रमुख अतिथी म्हणून राजगुरुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, शिवसेनेच्या विजया शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष हिरामण सातकर, जि. र. शिंदे (गुरुजी) उपस्थित होते.

हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, उपाध्यक्ष नाजनीन शेख, सचिव अमर टाटिया, संचालक ॲड. मनीषा पवळे, राजन जांभळे, ॲड.सुनील वाळुंज, संगीता तनपुरे, मधुकर गिलबिले, मीनाक्षी पाटोळे, डॉ. नीलम गायकवाड, राहुल मलघे, राहुल वाळुंज, दत्ता रुके आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सूत्रसंचालन आकाश बोंबले यांनी केले.

## सणासुदीत केसांना द्या खास ग्लो; RAISEची संपूर्ण हेअर केअर रिच्युअल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सणासुदीचा काळ म्हणजे नटणे, सजणे आणि आपल्या लूकमध्ये वेगळेपणा आणण्याची संधी. त्वचा आणि पोशाखांप्रमाणेच या काळात केसांचीही विशेष काळजी घेणे गरजेचे असते. सततचे हीट स्टायलिंग, दमट वातावरण, वारंवार केस धुणे आणि उन्हाच्या संपर्कामुळे केस कोरडे, फ्रिझी तसेच कमकुवत होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर RAISE by Jean Claude Biguineने सणासुदीच्या काळासाठी प्री-वॉश, वॉश आणि पोस्ट-वॉश अशा तीन टप्प्यांमध्ये संपूर्ण हेअर केअर रिच्युअल सादर केले आहे. प्री-वॉश केअरमध्ये RAISE Fall Fighter Pre-Wash Scalp Oilचा समावेश आहे.




४८ मिलीच्या या उत्पादनाची किंमत ₹२,४९९ असून, डबलिंग टेक्नॉलॉजीसह तयार करण्यात आलेल्या या स्कॅल्प ऑइलमध्ये आठ प्रकारच्या नैसर्गिक तेलांचे मिश्रण आणि Ceramide NPचा समावेश आहे. Rosemary Extract स्कॅल्पला पोषण देण्यास, तर Hemisqualane केसांची लवचिकता आणि मजबुती वाढविण्यास मदत करते.

## विवोचा IoT क्षेत्रात प्रवेश; Vivo Buds लॉँच

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

स्मार्टफोननंतर आता IoT क्षेत्रात विस्तार करत विवो इंडियाने 'Vivo Buds' हे नवीन वायरलेस इअरफोन्स लॉँच केले आहेत. हलके वजन, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, इमर्सिव्ह साउंड, AI आधारित कॉल नॉईज कॅन्सलेशन आणि सुलभ कनेक्टिव्हिटी या वैशिष्ट्यांमुळे हे बड्स संगीत, कॉलिंग, गेमिंग आणि मनोरंजनासाठी उपयुक्त ठरणार आहेत.




Vivo Buds मध्ये चार्जिंग केससह ५० तासांपर्यंतची बॅटरी लाइफ, एका चार्जवर १२ तासांपर्यंत म्युझिक प्लेबॅक, १० मिमी हाय-रिझोल्यूशन स्पीकर ड्रायव्हर, ड्युअल-माइक AI कॉल नॉईज कॅन्सलेशन आणि ४२ एमएस गेमिंग लेटन्सी देण्यात आली आहे. विवो इंडियाचे हेड ऑफ प्रॉडक्ट अँड GTM पैगाम दानिश म्हणाले, "आजच्या ग्राहकांना ऑडिओ डिव्हाइसकडून केवळ संगीत ऐकण्यापेक्षा अधिक अपेक्षा आहेत. इमर्सिव्ह साउंड, विश्वासार्ह बॅटरी लाइफ, स्पष्ट कॉल्स आणि सहज कनेक्टिव्हिटी यांचा दैनंदिन वापरात महत्त्वाचा वाटा आहे. Vivo Buds मध्ये ही वैशिष्ट्ये हलक्या आणि विचारपूर्वक डिझाइन केलेल्या उत्पादनात एकत्रित करण्यात आली आहेत. IoT क्षेत्रातील प्रवेशामुळे विवोची इकोसिस्टम स्मार्टफोनच्या पलीकडे विस्तारत आहे."

# गणेशोत्सवाच्या देखाव्यातून 'हरित शहरा'चा संदेश

- अभियंता विजय मोराळेंचा अभिनव उपक्रम
- आधुनिक शहर नियोजनासोबत पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम
- 'विकास करा, मात्र निसर्गाला सोबत घेऊन'चा संदेश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सव म्हटले की आकर्षक सजावट, रोषणाई आणि विविध विषयांवरील देखावे पाहायला मिळतात. मात्र, पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि आधुनिक शहर नियोजनाचा सुंदर संगम घडवून आणणारा अनोखा देखावा युवा उद्योजक व अभियंता विजय मोराळे यांनी साकारला आहे. गणेशोत्सवानिमित्त त्यांच्या अभियांत्रिकी व बांधकाम क्षेत्रातील कार्यालयात पर्यावरणपूरक गृहसंकुलाचा देखावा उभारण्यात आला असून, त्यातून 'विकास करा; मात्र निसर्गाला सोबत घेऊन' हा संदेश देण्यात आला आहे.

गेल्या दशकभरापासून बांधकाम क्षेत्रात कार्यरत असलेल्या विजय मोराळे यांच्या समूहाने आतापर्यंत विविध गृहसंकुले उभारली आहेत. बांधकाम क्षेत्रातील या अनुभवातून 'सुंदर शहर, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकास' ही संकल्पना गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडण्यात आली आहे. या देखाव्यात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, निवासी इमारती, बंगले तसेच आधुनिक शहरासाठी आवश्यक असलेल्या विविध सुविधांचे आकर्षक लघुरूप साकारण्यात आले आहे. विशेष म्हणजे शहराच्या विकासासोबत झाडे, हिरवाई आणि स्वच्छ पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. शहरांचा झपाट्याने होणारा विस्तार आणि त्यासोबत निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या लक्षात घेता, आधुनिक शहर उभारताना निसर्गाचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, हा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. 'विकास हवा, पण निसर्गाच्या सोबतीने' हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांनी केवळ देखाव्याच्या सजावटीचे कौतुक न करता त्यामागील पर्यावरणपूरक विचार समजून घ्यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक जनजागृती, पर्यावरण संवर्धन आणि सकारात्मक विचार मांडण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हे या उपक्रमातून दाखवून देण्यात आले आहे.

'विकास करा; मात्र निसर्गाला सोबत घेऊन करा' या विचारातून साकारलेल्या या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या देखाव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# अमितेश कुमार यांची येरवडा पोलीस ठाण्याला भेट

## गणेशाची आरती करून नागरिकांशी साधला मनमोकळा संवाद

## येरवडा पोलिसांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शनिवारी रात्री ११ वाजता येरवडा पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील श्री गणेशाची आरती करून उपस्थित नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. पोलीस आयुक्तांच्या या अनौपचारिक भेटीमुळे उपस्थित नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार येरवडा पोलीस ठाण्यात येणार असल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच विघ्नहर्ता ट्रस्टचे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित झाले. गणेशाची आरती झाल्यानंतर पोलीस आयुक्तांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत परिसरातील विविध प्रश्न आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या.

यावेळी डीजेमुक्त दहीहंडी तसेच ईद - ए - मिलादचा सण शांततामय आणि सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यासाठी नागरिकांची सर्वसमावेशक सहमती मिळवून घेतल्याबद्दल येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अभिनंदन केले. सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांसोबत नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, कल्याणीनगर परिसरात ध्वनी प्रदूषणाविरोधात जनजागृती तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मोनिका शर्मा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी येरवडा पोलिसांच्या कार्याचे कौतुक करणारा हस्तलिखित शुभेच्छा संदेश तयार केला होता. हा संदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रदान करण्यात आला. सामान्य नागरिकांमध्ये सहजपणे मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर कायदेशीर आणि प्रभावी उपाययोजना करणे तसेच नागरिकांचा विश्वास संपादन करून लोकाभिमुख पद्धतीने काम करण्याच्या येरवडा पोलिसांच्या कार्यपद्धतीचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.

'नागरिकांचा विश्वास, पोलिसांचा सेवाभाव आणि कायद्याचा सन्मान' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून येरवडा पोलीस ठाण्याची लोकाभिमुख वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहावी, अशा शुभेच्छांसह भेटीची सांगता झाली.




## भारताच्या पहिल्या EPD परिषदेत पर्यावरणीय पारदर्शकतेवर भर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्यावरणीय पारदर्शकता आणि शाश्वत उत्पादनाच्या दिशेने भारतातील उद्योगक्षेत्राला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने ग्रीनएक्स एन्व्हायर्न्मेंटलतर्फे भारतातील पहिली EPD परिषद 2026 मुंबईतील ताज लँड्स एंड, वांद्रे येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत धोरणकर्ते, नियामक संस्था, आंतरराष्ट्रीय EPD प्रोग्राम ऑपरेटर्स, शाश्वतता क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच भारतीय आणि बहुराष्ट्रीय उत्पादन कंपन्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी सहभागी झाले. एन्व्हायर्न्मेंटल प्रोडक्ट डिक्लेरेशन (EPD)च्या माध्यमातून उत्पादनांचा पर्यावरणीय प्रभाव वैज्ञानिक आणि विश्वासार्ह पद्धतीने मोजणे, पडताळणे आणि पारदर्शकपणे सादर करणे शक्य होते. जागतिक बाजारपेठांमध्ये शाश्वतता आणि पर्यावरणीय कामगिरीला वाढते महत्त्व मिळत असताना भारतीय उद्योगांनी आंतरराष्ट्रीय मानकांशी जुळवून घेण्यासाठी EPD, लाइफ सायकल असेसमेंट (LCA) आणि प्रोडक्ट कार्बन फूटप्रिंट (PCF) यांसारख्या साधनांचा प्रभावी वापर करण्याची गरज परिषदेत अधोरेखित करण्यात आली. परिषदेला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (MPCB) अध्यक्ष सिद्धेश रामदास कदम, रॉयल नॉर्वेजियन कॉन्सुलेट जनरलचे प्रतिनिधी, पद्मश्री डॉ. मिलिंद कांबळे, DICCIचे संस्थापक अध्यक्ष, ग्रीनएक्स एन्व्हायर्न्मेंटलच्या व्यवस्थापकीय संचालिका आरती भोसले-अहिवले, ग्रीन सोल्यूशन इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवले, EPD-नॉर्गेचे सीईओ हाकोन हौआन तसेच ग्रीन सोल्यूशन ग्रुप ऑफ कंपनीजचे प्रशांत गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया बेंगळुरूमध्ये

मुंबई (आरंभ पर्व) : भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – आईएमईए (भारत, मध्य पूर्व, अफ्रीका), मेस्से मुएनचेन आणि सीईओ , मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, "भारताचा इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. मॅन्युफॅक्चरिंगचा विस्तार, धोरणात्मक पाठबळ आणि ग्लोबल व्हॅल्यू चेनमधील वाढती भागीदारी या क्षेत्राच्या वाढीला पुढे नेत आहेत. इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 चा मोठा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय सहभाग हीच गती दर्शवतो. बेंगळुरूमध्ये आमचे लक्ष उद्योगाच्या महत्त्वाकांक्षा योग्य तंत्रज्ञान, पुरवठादार आणि भागीदारींसोबत जोडण्यावर आहे, ज्यामुळे मजबूत उत्पादन क्षमता विकसित होईल आणि चांगले व्यावसायिक परिणाम साधता येतील." इलेक्ट्रॉनिका इंडिया आणि प्रोडक्ट्रॉनिका इंडिया 2026 च्या नेशनल एडवाइजरी कमेटी चे सदस्य संजीव केसकर म्हणाले, "भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. मात्र ही वाढ कायम ठेवण्यासाठी देशांतर्गत क्षमता मजबूत करणे आणि प्रगत मॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानाचा वेगाने स्वीकार करणे आवश्यक आहे. ही प्रदर्शने निर्णय घेणाऱ्यांना वेगवेगळ्या उपायांची तुलना करण्याची, भारतीय आणि आंतरराष्ट्रीय पुरवठादारांशी थेट संपर्क साधण्याची आणि पुढील विस्तारासाठी आवश्यक तंत्रज्ञान व भागीदारी ओळखण्याची प्रत्यक्ष संधी देतात."

### उपकरणांसाठी प्रगत उपाय सादर करणार एनबीसी बेअरिंग्स

पुणे (आरंभ पर्व) : नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (एनईआय) चा प्रमुख बेअरिंग ब्रँड एनबीसी बेअरिंग्स बॉमा कॉनएक्सपो इंडिया २०२६ मध्ये सहभागी होणार आहे. हे प्रदर्शन १५ ते १८ सप्टेंबर २०२६ दरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे आयोजित केले जाणार आहे. यावेळी कंपनी बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणांसाठी आपल्या वाढत्या उत्पादन श्रेणीचे प्रदर्शन करणार असून, टिकाऊपणा, कार्यक्षमता आणि विविध गरजांनुसार विकसित केलेल्या अभियांत्रिकी उपायांवर विशेष भर दिला जाणार आहे. नॅशनल इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचे मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी राजेश प्रेमचंद्रन म्हणाले, "बांधकाम आणि महामार्गाबाहेरील उपकरणे अत्यंत कठीण परिस्थितीत काम करतात. अशा वेळी उपकरणांमधील भागांची विश्वासार्हता यंत्र किती काळ कार्यरत राहते आणि त्याची उत्पादकता यावर थेट परिणाम करते. एनबीसी बेअरिंग्समध्ये आम्ही उद्योग क्षेत्रासोबत जवळून काम करून त्यांच्या आव्हानांना समजून घेतो आणि प्रत्यक्ष कामकाजाच्या परिस्थितीनुसार योग्य उपाय विकसित करतो. बॉमा कॉनएक्सपो इंडिया आम्हाला आमच्या अभियांत्रिकी क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी तसेच उपकरण उत्पादकांच्या बदलत्या तांत्रिक गरजा समजून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देते."

### आईकूकडून जेड ११ एक्सए ५ जी लाँच

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : उच्च-कार्यक्षमता असलेल्या स्मार्टफोन ब्रँड आईकू ने आजआईकू जेड 11 एक्सए 5 जी लाँच केला, जो आजच्या विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केला आहे. हा स्मार्टफोन अशा विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केला आहे जे एकाच वेळी अनेक कामे करतात—ज्यात ऑनलाइन क्लासेस, संशोधन, असाइनमेंट्स, मनोरंजन, गेमिंग आणि प्रवासातही कनेक्टेड राहणे यांचा समावेश आहे. हा स्मार्टफोन त्यांच्या वेगवान, डिजिटल-फर्स्ट जीवनशैलीला समर्थन देण्यासाठी शक्तिशाली कार्यक्षमता, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मजबुती आणि एआई -सक्षम वैशिष्ट्ये एकत्र आणतो. आईकू च्या जेड -सिरीज लाइनअपला अधिक मजबूत करत, आईकू जेड 11 एक्सए 5 जी मध्ये 4एनएम प्रक्रियेवर तयार केलेला मीडियाटेक डाइमेंशन 7400-टर्बोप्रोसेसर, 44डब्ल्यू फ्लॅशचार्जसह 7200एमएएच बॅटरी आणि आई पी 68 व आई पी69 धूळ आणि पाणी प्रतिरोधक क्षमता आहे. या स्मार्टफोनमध्ये 120हर्ट्ज़ फ्रेश रेट असलेला 6.76-इंचाचा एफएचडी+ एलसीडी डिस्प्ले, ५० मेगापिक्सेल चा सोनीचा मुख्य कॅमेरा सेन्सर आणि 32एमपी चा फ्रंट कॅमेरा आहे. हा स्मार्टफोन अँड्रॉइड 16 वर आधारित ओरिजिनओएस 6 वर चालतो. आईकू जेड 11 एक्सए 5 जी च्या 8जीबी + 128जीबी व्हेरिएंटची किंमत ₹28,999 (निव्वळ प्रभावी किंमत: ₹27,499) आहे. हा टायटन ब्लॅक आणि प्रिझमॅटिक ग्रीन या दोन रंगांमध्ये उपलब्ध असेल. याची विक्री 14 सप्टेंबर रोजी दुपारी 12 वाजल्यापासून निवडक Vivo एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स आणि इतर रिटेल आउटलेट्सवर सुरू होईल.

### ग्रेटर नोएडा येथे होणार बाउमा कॉनएक्सपो इंडिया २०२६चे आयोजन



मुंबई (आरंभ पर्व) : कन्स्ट्रक्शन मशिनरी, बिल्डिंग मटेरियल मशिन्स, मायनिंग मशिन्स आणि कन्स्ट्रक्शन वाहनांसाठी भारतातील 2026 मधील सर्वात मोठ्या ट्रेड फेअर्सपैकी एक असलेल्या बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 चे आयोजन 15 ते 18 सप्टेंबरदरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर, ग्रेटर नोएडा येथे केले जाणार आहे. पूर्णपणे बुक झालेल्या या आठव्या आवृत्तीत 14.5 लाख चौरस फूट क्षेत्रात 1,100 हून अधिक प्रदर्शक सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाला 100 हून अधिक देशांमधून 75,000 पेक्षा जास्त व्हिजिटर्स येण्याची अपेक्षा आहे. बिहार सरकार स्टेट पार्टनर म्हणून सहभागी होणार आहे, तर 15 हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून येणारी खरेदीदारांची शिष्टमंडळे देशभरातील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी आवश्यक उपकरणांच्या गरजा मांडतील. भूपिंदर सिंह, प्रेसिडेंट – प्रेसिडेंट आईएमईए, मेस्से मुएनचेन और सीईओ, मेस्से मुएनचेन इंडिया म्हणाले, "भारताच्या इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी अशा उपकरणांची गरज आहे, जी केवळ कागदावरच नव्हे तर प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणीही चांगली कामगिरी करतील. खरेदीदार आता फक्त मशीनची वैशिष्ट्ये पाहत नाहीत, तर तिची उत्पादकता, कोणत्याही अडथळ्याशिवाय काम करण्याची क्षमता, ऑपरेटिंग कॉस्ट आणि मशीनसोबत मिळणाऱ्या सपोर्ट नेटवर्कलाही महत्त्व देतात. बाउमा कॉनएक्सपो इंडिया संपूर्ण इक्विपमेंट इकोसिस्टमला एकाच व्यासपीठावर आणते. त्यामुळे खरेदीदार योग्य माहितीच्या आधारे गुंतवणुकीचे निर्णय घेऊ शकतात आणि बाजारातील मागणीचे प्रत्यक्ष व्यावसायिक संधींमध्ये रूपांतर करू शकतात." बिल्डर्स एसोसिएशन ऑफ इंडिया चे नेशनल प्रेसिडेंट श्री. रविंद्र त्यागी म्हणाले, "कॉन्ट्रॅक्टर्ससाठी उपकरणे हा कोणत्याही प्रकल्पाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो.

# गणेशोत्सवात भक्तीसोबत शिक्षणाचा संकल्प

- श्रुफीन वेलफेअर फाउंडेशनचा अनोखा उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सव हा केवळ भक्ती आणि उत्सवाचा सोहळा न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव ठरावा, या उद्देशाने श्रुफीन वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने अनोखा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहे. गणरायाला हार-फुले अर्पण करण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावण्याचे आवाहन फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सविता विजय रासोटे / उपशिक्षिका यांनी नागरिकांना केले आहे.

या उपक्रमांतर्गत गणरायाच्या 'दानपेटीत शिक्षणाचे साहित्य' जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वही, पेन, पेन्सिल, पट्टी, पुस्तके यांसह विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य नागरिकांनी दान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांची छोटीशी मदतही एखाद्या गरजू विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासाला मोठी दिशा देऊ शकते, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

"गणरायाच्या चरणी फुले अर्पण करण्यासोबतच एखाद्या विद्यार्थ्याच्या हातात शिक्षणाची साधने देऊया," असा संदेश देत फाउंडेशनने "एक छोटी मदत... एका विद्यार्थ्याच्या मोठ्या स्वप्नासाठी!" हा प्रेरणादायी संकल्प पुढे ठेवला आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्ती, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम साधण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. संकलित शैक्षणिक साहित्य श्रुफीन वेलफेअर फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणार आहे.

गणेश मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन 'एक गणपती – एक शैक्षणिक मदत' हा संकल्प साकार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सहभागासाठी संपर्क**
**+91 96075 94578**
**श्रुफीन वेलफेअर फाउंडेशन**
**स्वप्न सत्यात उतरवणारी संस्था**

## मुलींच्या शिक्षणासाठी २५ सायकलींचे वाटप



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून जुन्नरच्या आदिवासी भागातील आपटाळे व आंबोली परिसरातील २५ गरजू विद्यार्थिनींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात आले. यासाठी जेधे सोशल फाउंडेशन व इंद्राणी बालन फाउंडेशन तसेच वर्षाताई डहाळे यांचे सहकार्य लाभले. आदिवासी भागातीललींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमास भाजपाच्या राज्य सचिव वर्षाताई डहाळे पोलीस निरीक्षक ददत्तात्रेय गुंड, भाजपा युवा मोर्चाचे पुणे जिल्हा गणेश कवडे, जनजाती विभाग राज्यपाल नियुक्त सदस्य ॲड. किरण गभाले, पंचायत समिती सदस्य संजय वऱ्हाडी, एकल अभियान अध्यक्ष विलास बोंद्रे, निलेश चव्हाण,सरपंच संतोष तळपे महादू निर्मळ, गुलाब साबळे, किरण म्हसकर आदी मान्यवर तसेच विद्यार्थिनी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायकल मिळाल्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थिनींच्या शाळेत ये-जा करण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असून, त्यांच्या शिक्षणाला नवी गती मिळणार आहे. कार्यक्रमाच्या आयोजनात संकल्प बहुउद्देशीय संस्थेचे सचिव संदीप कोल्हाळ यांची महत्त्वपूर्ण उपस्थिती होती.

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.संकल्प बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष सुषमा धाडवड यांनी आभार मानले.

## उभ्या सोयाबीनवर फिरला रोटर; शेतकऱ्याच्या डोळ्यांत पाणी

### दुबार पेरणी करूनही निसर्गाने हिरावला घास; ४० हजारांचा खर्च पाण्यात

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

ज्या पिकाकडे बळीराजा आपल्या लेकराप्रमाणे जपून पाहतो, त्याच उभ्या पिकावर अखेर रोटावेटर फिरवण्याची वेळ एका शेतकऱ्यावर आली. बार्शी तालुक्यातील सारोळे येथील शेतकरी अभिजीत मोरे यांनी आपल्या उभ्या सोयाबीन पिकावर रोटर चालवून ते जमीनदोस्त केले. डोळ्यांसमोर उभे पीक जळून खाक होताना पाहण्याची वेदना आणि केलेला हजारोंचा खर्च वाया जाण्याची हतबलता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने मोरे यांनी सोयाबीनची पेरणी केली. मात्र पेरणीनंतर तब्बल ४० दिवस पावसाने दडी मारली आणि पहिली पेरणी अक्षरशः मातीमोल झाली. एवढ्यावर न थांबता त्यांनी कर्ज काढून पुन्हा दुबार पेरणी केली.



दुसऱ्या पेरणीनंतर सुरुवातीला पावसाने साथ दिल्याने सोयाबीनचे पीक हिरवेगार झाले. शेतकऱ्याच्या डोळ्यांत पुन्हा आशेची पालवी फुटली. "यंदा तरी पीक हातात येईल आणि कर्जाचा भार थोडा हलका होईल," अशी अपेक्षा त्यांना होती. मात्र नियतीला काही वेगळेच मंजूर होते. पीक फुलोऱ्यात आले, शेंगा भरण्याची वेळ आली आणि पुन्हा पावसाने पाठ फिरवली. गेल्या तीन आठवड्यांपासून पावसाचा खंड पडल्याने कडक उन्हाने जमिनीतील ओलावा पूर्णपणे नाहीसा झाला. डोळ्यांसमोर हिरवेगार दिसणारे पीक हळूहळू पिवळे पडले, पाने गळून पडली आणि शेंगा पोसण्याआधीच सोयाबीन जळून गेले. शेवटी पीक वाचण्याची कोणतीही शक्यता उरली नसल्याचे लक्षात आल्यानंतर अभिजीत मोरे यांनी जड अंतःकरणाने आपल्या उभ्या पिकावर ट्रॅक्टरचा रोटर फिरवला. ज्या शेतात काही दिवसांपूर्वी हिरवेगार पीक डोलत होते, त्याच शेतात आज मातीचा थर दिसत आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, तो पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला चटका लावत आहे.

"दोन वेळा पेरणी केली. खत, औषध आणि फवारणीसाठी ४० हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला. पीक चांगले आले होते. हातातोंडाशी आलेला घास मिळणार अशी आशा होती. पण निसर्गाने सगळे हिरावून घेतले. आता हे पीक जनावरांच्या चाऱ्यालाही उपयोगी राहिले नाही. त्यामुळे काळजावर दगड ठेवून रोटर मारावा लागला," अशी व्यथा अभिजीत मोरे यांनी व्यक्त केली.

बार्शी तालुक्यातील सारोळे, पांगरी, उपळाईसह अनेक भागांत सोयाबीन उत्पादक शेतकरी अशाच दुहेरी संकटाचा सामना करत आहेत. पहिल्या पेरणीवर पावसाचा खंड आणि दुबार पेरणीनंतर शेंगा भरण्याच्या निर्णायक काळात पुन्हा पावसाने दिलेली हुलकावणी, यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे.

> शेतकऱ्याच्या शेतात रोटर फिरला, पण त्यासोबत त्याच्या आशा, मेहनत आणि कर्ज फेडण्याची स्वप्नेही मातीखाली गाडली गेली. आता प्रशासनाने केवळ पाहणी न करता तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी आर्त मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. लवकरच जिल्हा प्रशासनाकडून या संबंधित ठोस निर्णय होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना निश्चितपणे दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## आदिवासी शिक्षक संघटना व बिरसा ब्रिगेडने घेतली झिरवाळांची भेट



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य आदिवासी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व बिरसा ब्रिगेडचे कार्यकर्त्यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची नाशिक येथील निवासस्थानी भेट घेऊन शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली.यावेळी संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन मंत्र्यांना देण्यात आले. अन्नसुरक्षा मानके प्राधिकरणाचा परवाना मुख्याध्यापकांना बंधनकारक करू नये, प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांमध्ये पेसा टॅब द्यावा, आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता ४०० वरून १,५०० रुपये करावा, आदिवासी भागासाठी स्वतंत्र शैक्षणिक पुरस्कार सुरू करावेत, संचमान्यतेचे निकष शिथिल करावेत, सेवेत कार्यरत शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षेची अट रद्द करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. १ पेसा क्षेत्रातील १७ संवर्गाची कंत्राटी पदे नियमित करावीत, आदिवासी भागातील १२ हजार ५०० पदे तातडीने भरावीत आणि केंद्रप्रमुख भरती संवर्गनिहाय आरक्षणानुसार करावी,तसेच केंद्रीय विद्यालयात शाळा सोडल्याच्या दाखल्यावर फक्त ST अशी नोंद असतें तिथे अनुसूचित जमात नोंद किंवा अनुसूचित जमातीचा क्रमांक टाकावा अशी मागणीही करण्यात आली. यावेळी शिक्षकांच्या मागण्या समजून घेत मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शालेय शिक्षण मंत्र्यांसोबत मंत्रालयात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची लवकरच बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले. बिरसा ब्रिगेडच्या काही मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन देखील दिले. जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील रस्त्याच्या संदर्भात मागण्यासंदर्भात चर्चा केली तर त्यांच्या विशेष प्रयत्नातून जुन्नर आंबेगाव आदिवासी भागाला ला जोडणारा रस्ता लवकर पूर्ण होण्यासाठी बिरसा ब्रिगेड कडून निवेदन देण्यात आले. यामागणी संदर्भात पुणे जिल्हाधिकारी यांनाही त्यांनो शिफारस केली. यावेळी संघटनेचे राज्य अध्यक्ष निवृत्ती तळपाडे, सरचिटणीस मोतीराम पवार, राज्य नेते रामचंद्र शिंगाडे, राज्य कार्याध्यक्ष मोहन उंडे, पुणे विभागीय अध्यक्ष बाळासाहेब बांबळे, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदेव दाभाडे, बिरसा ब्रिगेड सहयाद्रीचे अध्यक्ष नवनाथ लहांगे नाशिक अध्यक्ष सर्जेराव भारमळ, बिरसा ब्रिगेड पुणे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी मडके,गणेश उंडे, आदिवासी विचार मंच कार्यकर्ते दत्ता जाधव उपस्थित होते.

## आउटडोअर लाईटिंगमध्ये स्टाइल आणि टिकाऊपणाचा संगम

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

घराच्या बाहेरील जागा घराच्या विस्ताराचा भाग म्हणून अधिकाधिक वापरल्या जात असताना, या जागांचे सौंदर्य आणि वातावरण खुलवण्यात प्रकाशयोजनेची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन क्रॉम्पटन ग्रीव्हज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने आधुनिक डिझाइन, टिकाऊपणा आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेचा संगम असलेली 'वॉलस्माईल' आउटडोअर डेको वॉल लाईट रेंज बाजारात सादर केली आहे. आधुनिक बाह्य जागांना प्रीमियम आणि आकर्षक लूक देण्याच्या उद्देशाने ही रेंज विकसित करण्यात आली आहे. बाल्कनी, पोर्च, पूलसाइड एरिया, लॉबी, पार्किंग स्पेस तसेच ॲक्सेंट आणि डिस्प्ले लाईटिंगसाठी या वॉल लाईट्सचा वापर करता येणार आहे. स्लीक सिलिंड्रिकल आकारामुळे लिनीया आउटडोअर भिंतींना आधुनिक आणि देखणा लूक देते. ६ वॅटची ही वॉल लाईट आधुनिक बाह्य सजावटीला पूरक ठरते. राउंड आणि स्क्वेअर अशा दोन आकारांमध्ये उपलब्ध असलेली नेक्सो ५ वॅटची वॉल लाईट आहे. समकालीन डिझाइनमुळे बाह्य जागांना स्वच्छ आणि सुसंस्कृत लूक मिळतो.




## चिमुकल्यांच्या हातून साकारला 'हरित गणराया'; नऱ्हे येथे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नऱ्हे परिसरात चिमुकल्यांनी शाडूच्या गणेशमूर्तींना आकर्षक रंग देत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संकल्प केला. विरांश युथ फाउंडेशन आणि बँगलोर स्कूल ॲक्टिव्हिटी यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे, खडकवासला मतदार संघाचे आमदार भिमराव आण्णा तापकीर, पुणे शहराचे महिला मोर्चा प्रभारी बिंदाताई गणात्रा , महिला अध्यक्ष मनीषा लडकत यांच्या मार्गदर्शनाखाली विरांशु फाऊंडेशन अध्यक्ष कोमलताई सतीश कुटे [महिला मोर्चा उपाध्यक्ष] माजी उपसरपंच सतीश प्रभाकर कुटे,राजू प्रभाकर कुटे प्रभाग अध्यक्ष, फाऊंडेशन उपाध्यक्ष मनिषा बाळासाहेब बोराते , फाऊंडेशन सहकारी पूनम भालेराव चव्हाण, या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. चिमुकल्यांनी स्वतःच्या हाताने शाडूच्या गणेशमूर्ती रंगविल्या. त्यामुळे मुलांचा गणरायाशी भावनिक संवाद निर्माण झाला असून, गणेशोत्सवाबरोबरच पर्यावरण रक्षणाचे महत्त्वही त्यांना समजले.

कोमल सतीश कुटे आणि सतीश प्रभाकर कुटे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. पारंपरिक पद्धतीने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा वापर करण्याऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तींचा स्वीकार करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. रंग, कला आणि संस्कार यांचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला. स्वतः रंगविलेल्या गणेशमूर्तीची घरी स्थापना करण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते. 'शाडूच्या गणपतीतून रुजणार हरित भविष्य' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे बालमनावर पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता पर्यावरणपूरक आणि सामाजिक जाणीव निर्माण करणारा उत्सव व्हावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मुंबईत ‘सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप’ची घोषणा

मुंबई (आरंभ पर्व) : क्रिकेट, मनोरंजन आणि उद्योगविश्वाचा अनोखा संगम असलेल्या बहुप्रतीक्षित ‘सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप’ (CTC) ची घोषणा मुंबईत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत करण्यात आली. या पत्रकार परिषदेला अभिनेता सुनील शेट्टी, सोहेल खान, अभिनेत्री दीपली साय्यद, सिद्धांत मोरे आणि हाफिज बेग यांची प्रमुख उपस्थिती होती. DivaTales Events प्रस्तुत ‘सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप’चा मुख्य क्रिकेट सामना ऑक्टोबर महिन्यात पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सेलिब्रिटीज, उद्योजक, व्यावसायिक आणि क्रिकेटप्रेमींना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. CTC ही केवळ क्रिकेट स्पर्धा नसून क्रिकेट, मनोरंजन आणि बिझनेस नेटवर्किंगचा अनोखा संगम ठरणार आहे. विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्ती या उपक्रमाशी जोडल्या जाणार असून, सेलिब्रिटीजची उपस्थिती हे या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. या प्रसंगी मुंबई हिरोजचे कर्णधार सुनील शेट्टी, मुंबई हिरोजचे सोहेल खान, CTCच्या ब्रँड ॲम्बेसेडर दीपली साय्यद, ब्रँड आयकॉन सिद्धांत मोरे तसेच CTC आणि DivaTales चे CMD हाफिज बेग यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी Gravity Group चे CMD मीहिर कुलकर्णी, Apli Sakhi च्या संचालिका संगीता तर्डे तसेच Pune Tycoons चे कर्णधार आणि Smita Holidays चे CMD जयंत गोरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.




### डीएस ग्रुपच्या पल्स कँडीचा गणेश महोत्सवाचा उत्साह

पुणे (आरंभ पर्व) : यंदाच्या गणेश महोत्सवा निमित्त धर्मपाल सत्यपाल ग्रुप (डीएस ग्रुप) या आघाडीच्या एफएमसीजी समूह आणि बहुव्यवसायिक कंपनीच्या लोकप्रिय ब्रँडपैकी एक असलेल्या पल्स कँडी कडून महाराष्ट्रात सलग पाचव्या वर्षी गणेश महोत्सव साजरा करण्यात येत आहे. ‘देश की पल्स से बना गणपती त्योहार’ या व्यापक ब्रँड संकल्पनेला पुढे नेत हा उत्सव साजरा केला जात आहे. महाराष्ट्रभर गणपती उत्सवाला लाभलेली सामूहिक भावना, परंपरा आणि भक्ती यांना केंद्रस्थानी ठेवत पल्स कँडीने गेल्या काही वर्षांत आपल्या गणेशोत्सवाच्या संकल्पनेत सातत्याने नवनवीन उपक्रमांची भर घातली आहे. ग्राहकांचा सहभाग अधिक वाढविण्यासाठी नाविन्यपूर्ण अनुभव निर्माण करण्याबरोबरच उत्सवाच्या मूळ भावनेशीही ब्रँडने सातत्याने नाते कायम ठेवले आहे. ही मोहीम १४ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि जळगाव या प्रमुख बाजारपेठांमध्ये राबविण्यात येणार आहे. या व्यापक संकल्पने अंतर्गत ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या ‘ पल्स से अर्पण, बप्पा को समर्पण’ या मोहिमेद्वारे नाविन्यपूर्ण अनुभवाची ही परंपरा पुढे नेण्यात येत आहे. या उपक्रमात भक्तांना परस्परसंवादी आणि मूषकावर आधारित अनुभवाच्या माध्यमातून बाप्पाला वैयक्तिक स्वरूपात डिजिटल अर्पण करण्याची संधी मिळणार आहे.

### लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा



• सौ. सविता विजय रासोटे •

उपशिक्षिका, पुणे

(दै. आरंभ पर्व)

“लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा...” ही ओळ ऐकली की मन नकळत आपल्या बालपणाच्या त्या सुंदर दिवसांत जाऊन पोहोचतं. किती साधं होतं ते आयुष्य आणि किती मोठा आनंद होता त्या साधेपणात! आई-वडिलांच्या बालपणीचा काळ तर आजच्या पिढीपेक्षा अगदी वेगळाच होता. त्या काळात सुखासाठी मोठमोठ्या वस्तूंची गरज नव्हती. अंगणात खेळणं, मित्रांसोबत हुंदडणं, आईच्या हातचं जेवण, बाबांचा प्रेमळ धाक, आजी-आजोबांच्या गोष्टी आणि सण-उत्सवांची लगबग यातच आयुष्याचं सारं सुख सामावलेलं होतं. “लहानपण देगा देवा...” या शब्दांमध्येच किती मोठी भावना आहे! मोठं झाल्यावर जबाबदाऱ्या वाढतात, धावपळ वाढते, माणसं जवळ असूनही मनं दूर जातात. पैसा, करिअर, सुख-सुविधा सगळं मिळतं; पण लहानपणीची निरागसता आणि मनमोकळं हसणं पुन्हा मिळत नाही. आई-वडिलांच्या काळात साधनं कमी होती, पण माणसं जास्त होती. घरं कदाचित छोटी होती, पण मनं मोठी होती. खिशात पैसे कमी होते, पण समाधान भरपूर होतं. एखादी छोटीशी गोष्ट मिळाली तरी त्याचा आनंद कित्येक दिवस मनात राहायचा. आज मुलांकडे मोबाईल, इंटरनेट, गेम्स, महागडी खेळणी आणि अनेक सुख-सुविधा आहेत. पण त्या काळातील अंगणातल्या खेळांचा आनंद, पावसात भिजण्याचा आनंद, सुट्टीत गावाला जाण्याचा आनंद, सगळ्यांनी एकत्र बसून जेवण्याचा आनंद तो कदाचित कोणत्याही स्क्रीनवर मिळू शकत नाही. बालपण हे खरंच आयुष्यातलं सोन्याचं पान असतं. तेव्हा भविष्याची चिंता नसते आणि भूतकाळाची खंतही नसते. फक्त वर्तमान असतं... आणि त्या वर्तमानात भरभरून जगण्याचा आनंद असतो. आज मागे वळून पाहताना जाणवतं आई-वडिलांच्या बालपणीचं ते सुख आयुष्यात परत कधीच मिळणार नाही. काळ पुढे गेला, जग बदललं, माणसं बदलली; पण त्या आठवणी मात्र मनात तशाच जिवंत आहेत. कधी वाटतं, पुन्हा एकदा तेच बालपण मिळावं... आईची हाक ऐकावी, बाबांच्या हाताला धरून चालावं, मित्रांसोबत मनसोक्त खेळावं आणि कोणतीही चिंता न करता खळखळून हसावं. म्हणूनच कदाचित संतांनी म्हटलं असेल “लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा...” कारण आयुष्यात कितीही मोठं झालो, कितीही यश मिळवलं, कितीही सुख-सुविधा मिळवल्या, तरी मनाच्या एका कोपऱ्यात आपलं ते निरागस बालपण कायमच जिवंत असतं. बालपण परत येत नाही... पण त्याच्या आठवणी आयुष्यभर मनाला गोडवा देत राहतात.

# तृप्तीताई देसाई यांचा महाराष्ट्रभर दौरा

### अनेक गणेश मंडळांकडून आमंत्रण

### कोणत्याही मंडळाला नाराज न करण्याची भूमिका

### सामाजिक बांधिलकी जपत गणेशोत्सवात राज्यभर संवाद



- मराठवाडा, विदर्भ, कोकण भागातून आमंत्रणाचा महापूर
- देसाई यांच्या हस्ते पुणे-मुंबई येथे आत्तापर्यंत ७० हून अधिक आरत्या

पुणे (दै. आरंभ पर्व)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांचा महाराष्ट्रभर गणेश मंडळांना भेटी देऊन गणपतीची आरती करण्याचा दौरा सुरू आहे. राज्यातील विविध शहरांमधील आणि ग्रामीण भागातील गणेश मंडळांकडून त्यांना आरतीसाठी मोठ्या संख्येने आमंत्रणे मिळत असून, शक्य तितक्या मंडळांना भेट देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जात आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिक, कार्यकर्ते आणि गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्यावरही त्यांनी भर दिला आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग मानला जातो. सार्वजनिक गणेश मंडळांच्या माध्यमातून विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच जनजागृतीचे उपक्रम राबविले जातात. या पार्श्वभूमीवर तृप्तीताई देसाई यांना विविध मंडळांकडून आरतीसाठी आमंत्रित करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, एका-दोन प्रमुख मंडळांपुरता दौरा मर्यादित न ठेवता विविध भागांतील मंडळांना भेट देण्याची त्यांची भूमिका चर्चेचा विषय ठरत आहे.

पुण्यासह मुंबई, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नागपूर आणि राज्यातील इतर भागांतील गणेश मंडळांकडून तृप्तीताई देसाई यांना आरतीसाठी आमंत्रणे येत असल्याचे सांगण्यात येते. अनेक मंडळांच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांच्याशी संपर्क साधून आरतीसाठी उपस्थित राहण्याची विनंती केली जात आहे.



गणेशोत्सवाच्या काळात मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असतो. अशा वेळी सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींनी मंडळांना भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधणे, त्यांच्या उपक्रमांची माहिती घेणे आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा करणे यामुळे गणेशोत्सवाच्या सार्वजनिक स्वरूपाला आणखी व्यापक आयाम मिळतो.

आपल्याला आरतीसाठी आमंत्रण देणाऱ्या कोणत्याही गणेश मंडळाला नाराज न करण्याची भूमिका तृप्तीताई देसाई यांनी घेतल्याचे सांगण्यात येते. वेळेचे नियोजन, प्रवासाचे अंतर आणि एकाच दिवशी असलेली अनेक आमंत्रणे यामुळे प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहणे शक्य नसले तरी शक्य तितक्या मंडळांना भेट देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. ‘ज्यांनी प्रेमाने आणि आपुलकीने आमंत्रण दिले, त्या मंडळाचा सन्मान राखला पाहिजे,’ या भावनेतून त्या दौऱ्याचे नियोजन करत असल्याचे कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. कोणत्या मंडळाला प्राधान्य द्यायचे, यापेक्षा सर्व मंडळांशी समानतेने संवाद साधण्याचा प्रयत्न त्यांच्या दौऱ्यात दिसून येत आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटक एकत्र येतात. त्यामुळे या उत्सवाचा उपयोग सामाजिक जागृतीसाठीही व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना स्थानिक पातळीवरील प्रश्न जाणून घेण्यावरही देसाई भर देत असल्याचे सांगितले जाते.

तृप्तीताई देसाई यांच्या उपस्थितीमुळे गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे. आरतीच्या निमित्ताने त्यांचे स्वागत, सत्कार आणि संवादाचे कार्यक्रमही विविध ठिकाणी आयोजित केले जात आहेत. अनेक मंडळांनी त्यांच्या भेटीचे नियोजन करून परिसरातील नागरिकांनाही उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकजुटीचा उत्सव व्हावा, या दृष्टिकोनातून विविध मंडळे उपक्रम राबवत आहेत. अशा मंडळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा तृप्तीताई देसाई यांचा प्रयत्न स्वागतार्ह असल्याची भावना काही मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

#### महाराष्ट्रभर दौऱ्याची उत्सुकता

गणेशोत्सवाच्या उर्वरित काळात तृप्तीताई देसाई आणखी कोणकोणत्या गणेश मंडळांना भेट देणार, याकडे कार्यकर्ते आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. मोठ्या संख्येने येणाऱ्या आमंत्रणांमुळे त्यांचे वेळापत्रकही व्यस्त झाले आहे. मात्र, आमंत्रण देणाऱ्या मंडळांचा सन्मान राखत कोणालाही नाराज न करण्याची त्यांची भूमिका गणेशोत्सवाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरणाला सकारात्मक संदेश देणारी ठरत आहे. गणपती आरतीच्या निमित्ताने महाराष्ट्रभर प्रवास, विविध गणेश मंडळांशी संवाद आणि सामाजिक प्रश्नांवर चर्चा, असा तृप्तीताई देसाई यांच्या गणेशोत्सवातील दौऱ्याचा व्यापक पट पाहायला मिळत आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात त्यांच्या मंडळ भेटी आणि आरती दौऱ्याची विशेष चर्चा होत आहे.

#### आरतीसोबत सामाजिक संवादालाही महत्त्व

तृप्तीताई देसाई यांच्या गणेश मंडळ भेटी केवळ आरतीपुरत्या मर्यादित न राहता सामाजिक संवादाचे माध्यम बनत आहेत. महिला सुरक्षा, सामाजिक प्रश्न, नागरिकांचे प्रश्न, युवकांचा सहभाग, व्यसनमुक्ती, स्वच्छता आणि सामाजिक सलोखा अशा विविध विषयांवर मंडळांच्या कार्यकर्त्यांशी चर्चा होत आहे.

#### आरोपांना कृतीतून उत्तर!

तृप्तीताई देसाई यांना गणपती आरतीसाठी महाराष्ट्रातील विविध गणेश मंडळांकडून आमंत्रणे मिळत आहेत. अनेक मंडळांना प्रत्यक्ष भेट देत आरतीत सहभागी होण्याचा त्यांचा दौरा सुरू आहे. ‘हिंदूविरोधी’ भूमिका घेत असल्याच्या आरोपांवर त्यांच्या गणेश मंडळ भेटी आणि आरतीतील सहभागातून उत्तर मिळत असल्याची चर्चा आहे. कोणत्याही मंडळाला नाराज न करण्याची त्यांची भूमिका विशेष चर्चेत आहे.

# चाळीस वर्षांपूर्वीचा पुण्यातील गणेशोत्सव

## आठवणींच्या अंगणातला बाप्पा



• सौ. सविता विजय रासोटे •

उपशिक्षिका, पुणे

(दै. आरंभ पर्व)

**पुणे... पुण्यनगरी... विद्येचे माहेरघर! संस्कृती, परंपरा, इतिहास आणि सामाजिक जाणिवांचा समृद्ध वारसा लाभलेल्या पुण्याची ओळखच काही वेगळी आहे. पुणे म्हटले की डोळ्यांसमोर येतो तो श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, कसबा गणपती, तुळशीबाग, मंडई, शनिवारवाडा आणि या सगळ्यांना आपल्या संस्कृतीच्या धाग्यात गुंफणारा पुण्याचा गणेशोत्सव.**

आज पुण्याचा गणेशोत्सव भव्य झाला आहे. आकर्षक विद्युत रोषणाई, मोठमोठे देखावे, ढोल-ताशांचा गजर, विविध सामाजिक उपक्रम आणि लाखो भाविकांची गर्दी यामुळे उत्सवाचे स्वरूप दिवसेंदिवस विस्तारत आहे. मात्र, या सगळ्या भव्यतेच्या पलीकडे मनाच्या एका कोपऱ्यात आजही जिवंत आहे तो चाळीस वर्षांपूर्वीचा पुण्यातील गणेशोत्सव. तो गणेशोत्सव साधा होता; पण मनाला अतिशय जवळचा होता. त्या काळात पुण्यात वाडा संस्कृती होती. शुक्रवार पेठेतील माझे घरही अशाच एका वाड्यात होते. वाड्यात राहण्याचा आनंद काही औरच होता. एका घराचे सुख-दुःख हे संपूर्ण वाड्याचे सुख-दुःख असायचे. सण-समारंभ आले की संपूर्ण वाडा जणू एका कुटुंबासारखा उत्साहाने भारून जायचा.

गणपती येणार म्हटले की काही दिवस आधीपासूनच घराची साफसफाई सुरू व्हायची. फळ्यावरची भांडी बाहेर काढली जायची, ती घासूनपुसून लख्ख केली जायची. घराची रंगरंगोटी, अंगणाची स्वच्छता, दारातली रांगोळी आणि सजावटीची तयारी यामध्ये घरातील प्रत्येकजण मनापासून सहभागी व्हायचा. त्या काळात आजच्यासारख्या सुखसुविधा नव्हत्या; मात्र सण आला की कामाचा थकवा जाणवत नसे. उलट काम करण्यातच आनंद असायचा. महिलांची तर विशेष लगबग असायची. घर स्वच्छ करणे, भांडी घासणे, सजावट करणे, नैवेद्याची तयारी करणे, प्रसाद बनवणे अशी अनेक कामे त्या आनंदाने करत असत.

आणि मग तो दिवस यायचा गणपती बाप्पांच्या आगमनाचा! अंगण स्वच्छ करून दारात सुंदर रांगोळी काढली जायची. भक्तिभावाने गणपतीचे स्वागत केले जायचे. आजच्यासारखे मोठमोठे ध्वनिक्षेपक किंवा गोंगाट नव्हता. ढोल-ताशांचा प्रचंड आवाज नव्हता. पण आमच्या वाड्यातील घंटानाद मात्र दूरपर्यंत घुमायचा. घंटा वाजली की सगळ्यांना कळायचे गणपती बाप्पा आले!

आमच्या परिसरातील पंचमुखी मारुती मंडळाचा गणपती विशेष आकर्षणाचा होता. साधी सजावट, छोटासा ध्वनिक्षेपक आणि मुलांच्या कलागुणांना वाव देणारे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम हे या उत्सवाचे वैशिष्ट्य होते. मुलांनी गाणी म्हणायची, कविता सादर करायच्या, नाटकांमध्ये भूमिका करायच्या. प्रत्येकाला आपली कला दाखवण्याची संधी मिळायची. आजच्या मोठ्या कार्यक्रमांच्या तुलनेत ते कार्यक्रम अगदी साधे होते; मात्र त्यात मुलांचा उत्साह, आत्मविश्वास आणि आपुलकी खूप मोठी होती.

गणपती आले की आमचा आणखी एक आवडता कार्यक्रम सुरू व्हायचा घरोघरी आरती! सायंकाळ झाली की आम्ही सगळे एकत्र बाहेर पडायचो. एकेका घरात जाऊन आरती म्हणायची. त्या काळी आरत्या जवळपास सगळ्यांना पाठ असायच्या. आरतीनंतर मिळणारा प्रसाद म्हणजे आनंदाची पर्वणीच! एका घरात प्रसाद, मग दुसऱ्या घरात प्रसाद... गप्पा, हशा, आरत्या आणि प्रसादाची रेलचेल सुरू असायची. कधी कधी इतका प्रसाद खाल्ला जायचा की घरी परतल्यावर जेवणाची इच्छाही उरायची नाही. पण त्या प्रसादाची खरी गोडी पदार्थात नव्हती; ती होती आपुलकीत.

आजच्या काळात एका क्षणात छायाचित्रे आणि चित्रफिती पाहता येतात. त्या काळी भ्रमणध्वनी नव्हते, समाजमाध्यमे नव्हती. छायाचित्र काढणेही सहज शक्य नव्हते. त्यामुळे कोणाच्या घरचा गणपती कसा आहे, कोणाची सजावट कशी आहे, हे पाहण्यासाठी प्रत्यक्ष त्या घरी जावे लागायचे. म्हणूनच गणपतीच्या दिवसांत घराबाहेर पडणे म्हणजे एक वेगळाच आनंद असायचा.

गणपतीच्या सजावटीची तयारी तर महिनाभर आधीपासून सुरू व्हायची. आज बाजारात तयार सजावटीच्या वस्तू सहज मिळतात; मात्र त्या काळात आमची सगळी सजावट घरच्या घरी आणि स्वतःच्या कल्पकतेने तयार व्हायची. कागदाच्या पट्ट्या बनवणे, झुरमुऱ्या तयार करणे, फुलांच्या माळा बनवणे, कागदाच्या विविध कलाकृती तयार करणे अशी कामे आम्ही मुले आई-बाबांना मदत करत करायचो. त्या सजावटीत महागडे साहित्य नव्हते; पण त्यात कुटुंबाचा वेळ, श्रम आणि प्रेम मिसळलेले होते. त्यामुळे साध्या सजावटीतही एक वेगळे सौंदर्य जाणवायचे.

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात बाहेरगावाहून पाहुणेही आवर्जून यायचे. पुण्याचे गणपती आणि देखावे पाहण्याची त्यांना विशेष उत्सुकता असायची. सामाजिक संदेश देणारे, रामायण-महाभारतातील प्रसंग साकार करणारे आणि विविध ऐतिहासिक घटना दाखविणारे पौराणिक व सामाजिक देखावे पाहताना मन हरखून जायचे. त्या काळात विद्युत रोषणाई मर्यादित होती. आजच्या सारखा झगमगाट नव्हता; पण त्या साधेपणातही एक वेगळे सौंदर्य होते. सात्त्विकता होती, चैतन्य होते, भक्तिभाव होता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणुसकी होती.

शुक्रवार पेठेतील घर असल्यामुळे पुण्यातील अनेक गणपती आम्ही चालत जाऊन पाहायचो. मंडई, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, तुळशीबाग, कसबा पेठ, बोहरी आळी अशा परिसरातून फिरताना गणपतीचे दर्शन घेतले की मन तृप्त व्हायचे. गणपतीच्या मूर्तीकडे कितीतरी वेळ पाहत बसावेसे वाटायचे. कोणतीही घाई नसायची. गर्दी तुलनेने कमी असायची. दर्शन म्हणजे केवळ रांगेत उभे राहणे नव्हते; दर्शन म्हणजे बाप्पाशी मनाने संवाद साधणे होते.

काळ बदलला आणि गणेशोत्सवाचे स्वरूपही बदलले. आज पुणे प्रचंड विस्तारले आहे. शहराची गती वाढली आहे. रस्त्यांवरील गर्दी वाढली आहे आणि प्रत्येकाच्या आयुष्याची धावपळही वाढली आहे. भ्रमणध्वनी, इंटरनेट, समाजमाध्यमे, घरातून काम करण्याची पद्धत आणि विविध आधुनिक सुविधा यामुळे जीवनशैली बदलली आहे. एकाच घरात राहणारी माणसेही कधी कधी आपापल्या कामात व्यस्त असतात. पूर्वी शेजारच्या घरातील आरतीला जाण्यासाठी वेळ असायचा; आज जवळच्या माणसाला भेटण्यासाठीही वेळ शोधावा लागतो.

गणेशोत्सवाचे रूप निश्चितच बदलले आहे. सजावट भव्य झाली आहे, देखावे मोठे झाले आहेत, रोषणाई वाढली आहे आणि उत्सवाचे अनेक नवे पैलू निर्माण झाले आहेत. मात्र, या बदलांकडे केवळ नकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज नाही. काळ बदलतो, समाज बदलतो आणि त्यानुसार उत्सवाचे स्वरूपही बदलते. आपणही बदल स्वीकारला पाहिजे; पण त्याच वेळी आपल्या जुन्या परंपरेतील आपुलकी, साधेपणा, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकी जपली पाहिजे. कारण गणेशोत्सवाचा खरा अर्थ केवळ भव्य सजावट किंवा मोठा उत्सव करण्यात नाही. गणेशोत्सव म्हणजे माणसांना जोडण्याचा उत्सव. गणेशोत्सव म्हणजे संस्कृती जपण्याचा उत्सव. गणेशोत्सव म्हणजे चांगल्या विचारांचा उत्सव. गणेशोत्सव म्हणजे समाजात सकारात्मकता आणि चैतन्य निर्माण करणारा उत्सव.

चाळीस वर्षांपूर्वीचा तो गणेशोत्सव आज आठवला की मन पुन्हा त्या जुन्या वाड्यात जाऊन पोहोचते. दारातली रांगोळी, घंटानादाचा घुमणारा आवाज, घरोघरीच्या आरत्या, प्रसादाचा गोडवा, कुटुंबासोबत केलेली कागदी सजावट, मंडळातील मुलांचे छोटेसे गुणदर्शन आणि गणपती पाहण्यासाठी पुण्याच्या रस्त्यांवर केलेली पायपीट या सगळ्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत.

आज त्या आठवणींची छायाचित्रे कदाचित नाहीत; पण त्या आठवणी मनाच्या कॅमेऱ्यात कायमच्या साठलेल्या आहेत. आजही गणपती बाप्पा आले की मन नकळत त्या जुन्या पुण्यात परत जाते. त्या वाड्याचा गंध जाणवतो, घंटानाद ऐकू येतो, आरतीचे सूर कानावर पडतात आणि प्रसादाच्या गोडव्याबरोबर जुन्या नात्यांची ऊबही जाणवते.

आणि मनापासून वाटते उत्सव कितीही मोठा झाला तरी मनातील भक्ती मोठी असावी. सजावट कितीही भव्य असली तरी नाती सुंदर असावीत. गोंगाट कितीही वाढला तरी मनातील शांतता टिकून राहावी. कारण बाप्पा तेव्हाही आपलेच होते आणि बाप्पा आजही आपलेच आहेत; फक्त काळ बदलला, उत्सवाचे रूप बदलले, शहर बदलले, पण बाप्पांवरील प्रेम मात्र अजूनही तेच आहे.

गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या!

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वडगाव खुर्दच्या कै. नारायणराव नवले मनपा शाळेची गरुडझेप

वडगाव खुर्द, पुणे (आरंभ पर्व) : प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमाच्या जोरावर कै. नारायणराव नवले महानगरपालिका शाळा क्रमांक 56 बी, वडगाव खुर्दच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवले आहे. यावर्षी तब्बल तेरा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. या यशाचे औचित्य साधून शाळेत गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या सक्रिय सदस्या सौ. विजया माने या उपस्थित होत्या. व्यासपीठावर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुमन विवेक गंथडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापिका गंथडे म्हणाल्या, हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नसून पालक आणि शिक्षकांच्या एकजुटीचे आहे." या यशामागे शाळेच्या मार्गदर्शक शिक्षिका सौ. माधवी आनंद पंडित व सौ. संगीता मधुकर जागडे यांची विशेष मेहनत आहे. त्यांनी शाळेच्या वेळेव्यतिरिक्त सकाळी व संध्याकाळी विशेष सराव वर्ग घेऊन, मागील प्रश्नपत्रिका सोडवून घेऊन विद्यार्थ्यांना तयार केले. कार्यक्रमाचे अतिशय ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन सौ. विनया योगेश सुर्यवंशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्रीमती राणी इष्टे यांनी मानले. या कार्यक्रमास मनपा शाळा क्रमांक 56 बी चे सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गणेश चतुर्थीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र मीशोच्या प्रमुख बाजारपेठांमध्ये

मुंबई (आरंभ पर्व) : यंदाच्या गणेश चतुर्थीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र हा मीशोच्या प्रमुख सणासुदीच्या बाजारपेठांपैकी एक ठरला आहे. राज्यात मुंबई आणि पुणे या सणासुदीच्या खरेदीसाठीच्या प्रमुख बाजारपेठा ठरल्या. विशेष म्हणजे, सणासुदीची ऑनलाइन खरेदी केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित न राहता लहान शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात विस्तारल्याचे दिसून आले. देशभरातील मीशोवरील गणेश चतुर्थीच्या एकूण ऑर्डर्सपैकी तब्बल ५३% ऑर्डर्स टियर-४ बाजारपेठांमधून आल्या. यामुळे छोट्या शहरांमध्येही सणासुदीच्या ई-कॉमर्सला मिळणारी वाढती पसंती अधोरेखित झाली आहे. यंदा गणेश चतुर्थीशी संबंधित उत्पादने मीशोवर सूचीबद्ध करणाऱ्या विक्रेत्यांच्या संख्येत मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २६% वाढ झाली असून, ही संख्या जवळपास ९,००० वर पोहोचली. यापैकी जवळपास १० पैकी ७ विक्रेते नवीन होते आणि त्यांनी यंदा प्रथमच गणेश चतुर्थीच्या संग्रहात सहभाग घेतला.



### नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये कार्यशाळा उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि गणेशोत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या उद्देशाने गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मूर्तिकार प्रशिक्षक सुंदरलाल कुमावत आणि वेदिका कुमावत यांनी विद्यार्थ्यांना गणपती मूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या हाताने आकर्षक गणपती मूर्ती साकारल्या. याप्रसंगी शाळेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुनीता डांगे, प्राचार्या सौ. प्रियंका गुजराती, संचालक श्री. राजाराम डांगे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देणारी आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देणारी ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.




बेल्हे ता. जुन्नर येथील अश्विनी अभिजित केसकर यांनी गौरी गणपतीसमोर साडेतीन शक्तिपीठे दर्शविणारी सुंदर आरास केली असून विद्युत रोषणाई व फराळाचे विविध पदार्थांची आकर्षक मांडणी केली आहे.



दै. आरंभ पर्वच्या संपादिका सौ. सुरेखा मते यांच्या निवासस्थानी गौराईचे उत्साहात स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने घरामध्ये आकर्षक फुलांची व पारंपरिक वस्तूंची सजावट करण्यात आली होती. गौराईची सुंदर आरास, आकर्षक रोषणाई आणि पारंपरिक सजावटीमुळे भक्तिमय व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कुटुंबीयांनी पारंपरिक पद्धतीने गौराईची पूजा-अर्चा करून उत्सव साजरा केला.

# प्राथमिक शाळेमध्ये क्रीडा स्पर्धांचे महत्व

**श्री. सुनिल महादेव कटके (उपशिक्षक)**
**पुणे महानगरपालिका शाळा (नऱ्हे)**
**मो. 9657146767**

(दै. आरंभ पर्व)

**"शरीर सुदृढ तर मन प्रसन्न" असे म्हटले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षणाबरोबरच क्रीडेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.**



क्रीडा स्पर्धा म्हणजे केवळ जिंकणे किंवा हरणे नव्हे. त्या विद्यार्थ्यांना शिस्त, संघभावना, नेतृत्व, आत्मविश्वास, चिकाटी, निर्णयक्षमता आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता शिकवतात. प्राथमिक शाळांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देतात आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देतात. त्यामुळे प्राथमिक शिक्षणात क्रीडा स्पर्धांना अभ्यासाइतकेच महत्त्व देणे ही काळाची गरज आहे.

प्राथमिक शाळेतील मुले उत्साही, जिज्ञासू आणि सतत काहीतरी नवीन करण्याची इच्छा असलेली असतात. त्यांच्यामध्ये भरपूर ऊर्जा असते. ही ऊर्जा योग्य दिशेने वापरली गेली तर त्याचा त्यांच्या विकासावर सकारात्मक परिणाम होतो. धावणे, उडी मारणे, चेंडूचे खेळ, कबड्डी, खो-खो, लंगडी, लेझीम, योगासने, मैदानी खेळ अशा विविध उपक्रमांमधून मुलांचा शारीरिक विकास होतो.

प्राथमिक वयात नियमित क्रीडा सहभागामुळे शरीराची वाढ आणि विकास अधिक चांगल्या प्रकारे होण्यास मदत होते. तसेच योग्य शारीरिक हालचालींमुळे आळस कमी होतो आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण होतो. त्यामुळे शाळेने अभ्यासक्रमाबरोबरच क्रीडेला नियमित वेळ देणे आवश्यक आहे.

क्रीडा केवळ शरीराचा व्यायाम नाही तर तो मेंदूचाही व्यायाम आहे. विविध खेळांमध्ये परिस्थितीनुसार निर्णय घ्यावे लागतात. प्रतिस्पर्ध्याची चाल ओळखणे, योग्य वेळी कृती करणे, नियमांचे पालन करणे आणि संघाच्या हिताचा विचार करणे यामुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित होते.

खेळताना विद्यार्थ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. एखाद्या स्पर्धेत पराभव झाला तरी पुढच्या वेळी अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता आणि सकारात्मक विचारसरणी निर्माण होते. कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व्हॉलीबॉल यांसारख्या सांघिक खेळांमध्ये प्रत्येक खेळाडूचे योगदान महत्त्वाचे असते. एकट्या व्यक्तीपेक्षा संपूर्ण संघाच्या कामगिरीला महत्त्व असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना एकमेकांना सहकार्य करण्याची सवय लागते.

प्रत्येक खेळाला काही नियम असतात. खेळाडूने ते नियम पाळले नाहीत तर तो खेळाचा आनंद आणि स्पर्धेची शिस्त बिघडवू शकतो. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना नियमांचे पालन करण्याची सवय लागते. विजय मिळाल्यावर नम्र राहणे आणि पराभव झाल्यावर निराश न होता पुन्हा प्रयत्न करणे हा क्रीडेचा महत्त्वाचा धडा आहे. "पराभव हा शेवट नसून पुढील यशाची सुरुवात आहे" ही सकारात्मक भावना क्रीडेमुळे निर्माण होते. अशा विद्यार्थ्यांमध्ये भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची मानसिक ताकद वाढते.

क्रीडा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना नेतृत्व करण्याच्या संधी मिळतात. संघाचा कर्णधार म्हणून निर्णय घेणे, सहकाऱ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांना प्रोत्साहित करणे आणि संघाला विजयाकडे घेऊन जाणे यामुळे नेतृत्वगुण विकसित होतात. प्राथमिक शाळेत छोट्या स्वरूपात दिलेल्या नेतृत्वाच्या संधी भविष्यात जबाबदार नागरिक घडविण्यास मदत करतात. नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नसून इतरांना सोबत घेऊन पुढे जाणे हे विद्यार्थी क्रीडेतून शिकतात.

खेळात प्रत्येक परिस्थिती पूर्वनियोजित नसते. प्रतिस्पर्ध्याच्या कृतीनुसार खेळाडूला तत्काळ निर्णय घ्यावा लागतो. यामुळे विद्यार्थ्यांची परिस्थितीजन्य विचारशक्ती आणि सर्जनशीलता विकसित होते.

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या क्षमतेनुसार क्रीडा उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतल्यास त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढतो आणि इतर विद्यार्थ्यांमध्येही संवेदनशीलता निर्माण होते. त्यामुळे क्रीडा स्पर्धा समावेशक शिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात.

"कालपेक्षा आज चांगली कामगिरी करणे" हा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला तर स्पर्धा सकारात्मक ठरते. यामुळे मत्सर किंवा अहंकार न वाढवता निरोगी स्पर्धात्मक वृत्ती विकसित होते. प्राथमिक शाळांमध्ये क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. केवळ चांगले खेळणाऱ्या विद्यार्थ्यांनाच संधी न देता प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार संधी देणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खेळाचे नियम, सुरक्षिततेचे नियम आणि खेळातील शिस्त समजावून सांगावी. विजय मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करावे; पण पराभूत विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन देऊन त्यांच्या प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित करावे.

प्राथमिक शाळांमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन करताना विद्यार्थ्यांचे वय आणि शारीरिक क्षमता लक्षात घेणे आवश्यक आहे. धावण्याच्या शर्यती, लंगडी, खो-खो, कबड्डी, चेंडूचे खेळ, दोरीउडी, लांब उडी, गोळाफेक यांसारख्या उपक्रमांचे योग्य नियोजन करता येते.

शाळेच्या वेळापत्रकात नियमित क्रीडा तास असावेत. वार्षिक क्रीडा स्पर्धांबरोबरच वर्षभर छोट्या-छोट्या क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. अशा प्रकारे क्रीडा ही केवळ वार्षिक कार्यक्रमाची गोष्ट न राहता शालेय जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे. प्राथमिक शाळेतील क्रीडा स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. क्रीडेमुळे शरीर सुदृढ होते, मन प्रसन्न राहते, आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात, संघभावना निर्माण होते आणि शिस्तीची सवय लागते. त्याचबरोबर विजय आणि पराभवाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची क्षमता, निर्णयक्षमता, एकाग्रता आणि सामाजिक कौशल्ये विकसित होतात.

म्हणूनच "खेळा, जिंका आणि निरोगी राहा" एवढ्यापुरते क्रीडेचे महत्त्व मर्यादित न ठेवता "खेळातून शिकूया, शिकण्यातून घडूया आणि जीवनासाठी तयार होऊया" हा दृष्टिकोन प्राथमिक शिक्षणात रुजविला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला मैदानावर खेळण्याची, स्पर्धेत सहभागी होण्याची आणि स्वतःचे कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळाली, तर शाळा केवळ ज्ञान देणारी संस्था न राहता सक्षम आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविणारे केंद्र बनेल. त्यामुळे प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक व्यवस्थेत क्रीडा स्पर्धांना अनन्यसाधारण महत्त्व देणे ही केवळ गरज नसून निरोगी, सक्षम आणि आत्मविश्वासी पिढी घडविण्याची जबाबदारी आहे.

## गणपतीची पालखीतून मिरवणूक



जुन्नर (दै. आरंभ पर्व)

टाळ-मृदंगाचा गजर आणि फुलांच्या वर्षावात जुन्नरच्या मानाच्या पहिल्या रविवार पेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाची पारंपरिक पालखीतून मिरवणूक काढली. १३५ वर्षांची परंपरा असलेल्या या गणेशमूर्तीची ग्रामदैवत सिद्धिविनायक गणेश मंदिरात विधिवत स्थापना केली. मिरवणुकीत भगवे ध्वजधारी,बाल वारकरी, मंडळाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ सहभागी झाले होते. मूर्तिकार मुकुंद राक्षे यांच्या निवासस्थानापासून छत्र व अब्दागिरीच्या साथीत मिरवणुकीचा शुभारंभ झाला. यावेळी नगराध्यक्ष सुजाता काजळे, नगरसेविका अंजली शिंदे, नगरसेवक नंदू तांबोळी, मंडळाचे अध्यक्ष अमोल माळवे यांच्यासह पदाधिकारी व ज्येष्ठ कार्यकर्ते सहभागी झाले होते. शहरातील कल्याण पेठ, सदा बाजारपेठ, तेली बुधवार, वरली आळी, सराई कापेठ, ब्राह्मण बुधवार पेठ, भोई आळी, कुंभारवाडा, शंकरपुरा, खालचा माळीवाडा, भाई कोतवाल चौक आदी भागातील गणेशोत्सव मंडळांनी आकर्षक सजावट व विद्युत रोषणाईसह मिरवणुका काढून गणरायाची प्रतिष्ठापना केली.

## कोकणवासीयांसाठी गणपती विशेष बससेवा

### कोकण रहिवाशी समाज संघाचा १५ वर्षांपासूनचा उपक्रम; विविध मार्गांवर बसेस रवाना

पुणे (दै. आरंभ पर्व)

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या सिंहगड रोड परिसरातील कोकणवासीयांच्या सोयीसाठी कोकण रहिवाशी समाज संघाच्या वतीने दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी गणपती विशेष बससेवेचे आयोजन करण्यात आले. सावंतवाडी, चिपळूण, चिपळूण-मुसाड, महाड आणि पोलादपूर, खेड,या मार्गांवर विशेष बसेस सोडण्यात आल्या. गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाणाऱ्या चाकरमान्यांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कोकण रहिवाशी समाज संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यादव यांच्या संकल्पनेतून गेल्या १५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. दरवर्षी या बससेवेला कोकणवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मोठ्या संख्येने नागरिक या सेवेचा लाभ घेतात. यंदाच्या बससेवेचे नियोजन गेल्या दोन महिन्यांपासून सुरू होते.



> गणेशोत्सवाच्या निमित्ताने कोकणवासीयांना आपल्या गावाकडे वेळेत आणि सुरक्षितपणे पोहोचता यावे, यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे प्रवाशांकडून कौतुक करण्यात आले. गेल्या १५ वर्षांपासून सुरू असलेल्या या सामाजिक उपक्रमामुळे सिंहगड रोड परिसरातील कोकणवासीयांना गणेशोत्सवाच्या काळात मोठा दिलासा मिळत आहे.
> **- प्रकाश यादव, संस्थापक अध्यक्ष, कोकण रहिवाशी समाज संघ, पुणे**

प्रवाशांची संख्या, विविध मार्ग, बसचे नियोजन तसेच आवश्यक बाबींची पूर्वतयारी करण्यात आली होती. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या नियोजनामुळे दि. १२ सप्टेंबरच्या रात्री तसेच दि. १३ सप्टेंबरच्या सकाळी नियोजित ठिकाणांहून बसेस सुरळीतपणे रवाना करण्यात आल्या. या उपक्रमाच्या नियोजनात संघटनेचे मुकेश शिंदे, परेश आंगणे, तेजस जंगम आणि अक्षय येलेंजे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रवाशांचा प्रवास सुखकर व सुरक्षित व्हावा, यासाठी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सिंहगड रोड परिसरातील कोकणात गणपती उत्सवानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांनी कोकण रहिवाशी समाज संघाच्या वतीने राबविण्यात आलेल्या गणपती विशेष बससेवेबद्दल समाधान व्यक्त केले. सुरक्षित, सोयीस्कर आणि नियोजित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रवाशांनी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यादव तसेच सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

गणेशोत्सवाच्या काळात गावी जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरवर्षी अशाच प्रकारे विशेष बससेवेचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षाही प्रवाशांनी व्यक्त केली. गणपती विशेष बससेवेच्या शुभारंभप्रसंगी नगरसेवक हरिदास चरवड यांनी नारळ फोडून बसेस मार्गस्थ केल्या. यावेळी पत्रकार मिलिंद पानसरे, सुभाष चव्हाण, मितेश राणे, रमेश भुवड आणि सचिन राजवीर उपस्थित होते.

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे : निसर्गाकडून शिकण्याचा संस्कार

• सौ. सविता विजय रासोटे •
उपशिक्षिका, पुणे

(दै. आरंभ पर्व)

**"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळी केवळ निसर्गप्रेम व्यक्त करणाऱ्या नाहीत, तर मानव आणि निसर्ग यांच्यातील अतूट नाते अधोरेखित करणाऱ्या आहेत. झाडे, वेली, फुले, पक्षी, प्राणी, नद्या आणि पर्वत हे आपल्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. निसर्ग हा आपला खरा सोयरा आहे आणि त्याचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.**



झाड म्हणजे केवळ हिरवीगार पाने, फांद्या आणि सावली नव्हे; झाड म्हणजे जीवनाचा श्वास आहे. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतात, पावसाचे चक्र संतुलित ठेवतात आणि मातीची धूप रोखतात. असंख्य पक्षी, कीटक आणि प्राण्यांना झाडांमुळे निवारा मिळतो. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे केवळ जमिनीत एक रोप लावणे नव्हे, तर एका संपूर्ण जीवसृष्टीला आधार देण्याचे कार्य होय. निसर्ग हा माणसाचा सर्वांत मोठा शिक्षक आहे. झाड आपल्याला निःस्वार्थपणे देण्याची शिकवण देते. स्वतः उन्हात उभे राहून ते आपल्याला सावली देते. स्वतः पाऊस सहन करून आपल्याला फळे, फुले आणि अन्न देते. दगड मारला तरी झाड माणसाला फळच देते. त्याच्या या स्वभावातून आपण निःस्वार्थ सेवा, संयम आणि क्षमाशीलता शिकू शकतो. झाडाची मुळे जमिनीशी घट्ट जोडलेली असतात, तर त्याच्या फांद्या आकाशाला गवसणी घालतात. या साध्या चित्रातूनही जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान समोर येते. आपली मुळे, आपली संस्कृती आणि आपली मूल्ये यांच्याशी नाते घट्ट ठेवून मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा निसर्ग आपल्याला देतो.

निसर्गातील प्रत्येक घटक आपले कार्य निःशब्दपणे करत असतो. सूर्य प्रकाश देतो, नदी अखंड वाहत राहते, पक्षी किलबिलाट करत राहतात आणि झाडे शांतपणे वाढत राहतात. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता देत राहणे हीच निसर्गाची खरी शिकवण आहे. मात्र माणूस आपल्या गरजा वाढवत असताना निसर्गाकडून घेतच राहिला आणि निसर्गाला परत देण्याचे भान अनेकदा विसरला. आज वाढते शहरीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. वाढते तापमान, अनियमित पाऊस, पाण्याची कमतरता, वाढते प्रदूषण आणि नैसर्गिक आपत्ती यांचा परिणाम मानवी जीवनावर होत आहे. या परिस्थितीत पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन आणि वृक्षारोपणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच 'एक व्यक्ती एक झाड' ही संकल्पना प्रत्येकाने मनापासून स्वीकारण्याची गरज आहे. मात्र केवळ वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेऊन फोटो काढणे आणि त्यानंतर त्या रोपाकडे दुर्लक्ष करणे हा वृक्षसंवर्धनाचा मार्ग नाही. झाड लावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्याचे संगोपन करणे, नियमित पाणी देणे, संरक्षण करणे आणि ते मोठे होईपर्यंत त्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

आज आपण लावलेले एक छोटेसे रोप उद्या आपल्या मुलांना सावली देणार आहे. आज निर्माण केलेली हिरवाई पुढच्या पिढीला शुद्ध हवा देणार आहे. आपण जपलेले एक झाड अनेक पक्ष्यांचे घर होऊ शकते, अनेक जीवांना आधार देऊ शकते आणि परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभार लावू शकते. म्हणून वृक्षारोपण ही केवळ पर्यावरणाची गरज नाही; ती भावी पिढ्यांप्रती असलेली आपली सामाजिक जबाबदारी आहे. आपण निसर्गाकडून घेतच आलो आहोत हवा, पाणी, अन्न, औषधे, फळे, फुले आणि जगण्यासाठी आवश्यक असंख्य गोष्टी. आता निसर्गाला काहीतरी परत देण्याची वेळ आली आहे. आपल्या घराभोवती, शाळेच्या परिसरात, सार्वजनिक ठिकाणी, गावात आणि शहरात शक्य तिथे झाडे लावली पाहिजेत. त्याहून महत्त्वाचे म्हणजे अस्तित्वात असलेली झाडे तोडली जाणार नाहीत, यासाठीही सजग नागरिक म्हणून आवाज उठवला पाहिजे. निसर्गाशी नाते केवळ एका दिवसापुरते किंवा एखाद्या वृक्षारोपण मोहिमेपुरते मर्यादित नसावे. मुलांना लहानपणापासून झाडांचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी झाडे लावण्याबरोबरच त्यांची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कुटुंबांनीही वाढदिवस, लग्नसमारंभ किंवा अन्य आनंदाच्या प्रसंगी वृक्षारोपण करण्याची परंपरा निर्माण केली तर पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा मिळू शकते.

निसर्ग आपल्याला केवळ जगण्याची साधने देत नाही, तर जगण्याची पद्धतही शिकवतो. झाडासारखे देत राहणे, नदीसारखे वाहत राहणे, सूर्याप्रमाणे प्रकाश देणे आणि मातीप्रमाणे सर्वांना सामावून घेणे ही निसर्गाची जीवनमूल्ये आहेत. माणसाने ही मूल्ये आत्मसात केली तर समाज अधिक संवेदनशील आणि समृद्ध होऊ शकतो.

चला, निसर्गाशी पुन्हा एकदा आपले नाते दृढ करूया. एक रोप लावूया आणि त्याला लेकरासारखे वाढवूया. एक झाड वाचवूया आणि त्यातून अनेक जीवांचे जीवन वाचवूया. आपल्या परिसरात हिरवाई वाढवूया आणि पुढच्या पिढीसाठी सुंदर, स्वच्छ आणि निरोगी पृथ्वी निर्माण करण्याचा संकल्प करूया.

कारण "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" ही केवळ अभंगातील ओळ नाही; ती निसर्गाशी आपले नाते जपण्याची जीवनदृष्टी आहे. निसर्ग वाचवला तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणून आजपासून प्रत्येकाने एक छोटीशी सुरुवात करूया एक झाड लावूया, एक झाड जगवूया आणि निसर्गाशी मैत्री करूया.

झाडे लावा... झाडे जगवा...
निसर्गाशी मैत्री करा!
आजचे वृक्षसंवर्धन म्हणजे
उद्याच्या पिढीसाठी जीवनदान!

## थोडक्यात पण महत्वाचे



### इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची ICAच्या ग्लोबल बोर्डावर निवड

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय सहकार क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या घडामोडीत इफ्कोचे अध्यक्ष दिलीप सांघाणी यांची आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडीच्या (ICA) ग्लोबल बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवर 'अॅट-लार्ज डायरेक्टर' म्हणून निवड झाली आहे. पनामा येथे झालेल्या ICAच्या महासभेदरम्यान झालेल्या निवडणुकीत सांघाणी यांना ही जबाबदारी मिळाली. सांघाणी यांच्या विजयाची घोषणा होताच पनामा येथे उपस्थित भारतीय सहकारी प्रतिनिधी मंडळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रतिनिधींनी 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणा देत आनंद व्यक्त केला. जागतिक सहकार क्षेत्राच्या व्यासपीठावर भारतीय प्रतिनिधीची झालेली निवड ही देशाच्या सहकार चळवळीच्या वाढत्या प्रभावाचे द्योतक मानली जात आहे. दिलीप सांघाणी गेल्या अनेक दशकांपासून सहकार क्षेत्राशी संबंधित असून, शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण यासाठी त्यांनी काम केले आहे. ते सध्या इफ्को तसेच *गुजरात को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (गुजकोमासोल)*चे अध्यक्ष आहेत. याशिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध सहकारी संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

### भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारकाचे प्रत्यक्ष काम तातडीने सुरू करा



पुणे (आरंभ पर्व) : भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभ स्मारकाच्या मंजूर १०० कोटी रुपयांच्या बृहत् विकास आराखड्यांतर्गत प्रत्यक्ष कामाला तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी भीमा कोरेगाव विजयस्तंभ राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि पुण्याचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. स्मारकाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी ३० कोटी रुपयांचा निधी तातडीने वर्ग करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. पुणे दिवाणी न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालात विजयस्तंभ स्मारकासाठी जागा संपादित करताना कायदेशीर प्रक्रिया राबविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर डंबाळे आणि डॉ. धेंडे यांनी सामाजिक न्याय मंत्र्यांसह पुणे जिल्हाधिकाऱ्यांनाही स्वतंत्र निवेदन दिले आहे. संयुक्त निवेदनात राहुल डंबाळे आणि डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारने २०२७ पर्यंत विजयस्तंभ परिसराचा विकास करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सुशोभीकरणासह आवश्यक पायाभूत सुविधांची कामे तातडीने सुरू होणे गरजेचे आहे.

### दक्षम कॅपिटलमध्ये सौरभ मुंढड़ा यांची सह-संस्थापकपदी नियुक्ती



पुणे (आरंभ पर्व) : व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार गुंतवणूक व भांडवली उपाययोजना उपलब्ध करून देणाऱ्या दक्षम कॅपिटलने सौरभ मुंढड़ा यांची सह-संस्थापक आणि पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती १ ऑगस्ट २०२६पासून लागू झाली आहे. कॉर्पोरेट बँकिंग, भांडवली बाजार, धोरणात्मक वित्त आणि सल्लागार क्षेत्रातील दोन दशकांहून अधिक अनुभवाच्या बळावर मुंढड़ा पश्चिम विभागातील दक्षम कॅपिटलच्या सल्लागार व्यवसायाच्या विस्ताराचे नेतृत्व करणार आहेत. दक्षम कॅपिटल सध्या संपत्ती सल्ला, खासगी भांडवल आणि धोरणात्मक सल्ला या क्षेत्रांमध्ये संशोधनाधारित व्यासपीठ विकसित करत आहे. कुटुंबीय कार्यालय सल्ला, खासगी बँकिंग, गुंतवणूक बँकिंग, मालमत्ता व्यवस्थापन आणि संरचित आर्थिक उपाययोजना अशा विविध सेवांच्या माध्यमातून उद्योजक, प्रवर्तक, कुटुंबे आणि व्यवसायांशी संबंध अधिक दृढ करण्यावर कंपनीचा भर आहे.

### साध्या पोटाच्या त्रासाच्या तपासणीत किडनीचा कर्करोग

पुणे (आरंभ पर्व) : जुलाबाच्या त्रासासाठी करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत किडनीमध्ये कर्करोगाची गाठ आढळलेल्या ४४ वर्षीय महिलेवर भोसरी येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये किडनी वाचविणारी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली. कर्करोगाची गाठ पूर्णपणे काढण्यात आली असून संपूर्ण किडनी काढण्याची गरज भासली नाही. रुग्णाची प्राथमिक तपासणी मेडिकव्हर हॉस्पिटलचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. रिझवान मलिक यांनी केली. सोनोग्राफीदरम्यान किडनीमध्ये गाठ आढळल्यानंतर कॉन्ट्रास्ट सीटी स्कॅन करण्यात आला. त्यामध्ये उजव्या किडनीमध्ये रेनल सेल कार्सिनोमाचा संशय असलेली गाठ आढळून आली. त्यानंतर रुग्णाला मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. निखिल थर्स्टिंग आणि सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशिष बांगर यांच्याकडे पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या बहुविशेषज्ञ ट्यूमर मंडळाने या प्रकरणाचा सखोल अभ्यास केला. या मंडळात डॉ. आशिष बांगर, डॉ. निखिल थर्स्टिंग, युरोलॉजिस्ट डॉ. सुमित चौधरी, तसेच रेडिओलॉजिस्ट डॉ. अक्षय चिकर आणि डॉ. अमेय महाजन यांचा समावेश होता. गाठीचा रेनल नेफ्रोमेट्री गुणांक १० असल्याने ती अत्यंत गुंतागुंतीची असल्याचे निदर्शनास आले. संपूर्ण किडनी काढण्याऐवजी किडनीचे कार्य शक्य तितके जपण्याच्या उद्देशाने अंशतः नेफ्रेक्टॉमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. आशिष बांगर यांच्या नेतृत्वाखाली लॅप्रोस्कोपिक पद्धतीने अंशतः नेफ्रेक्टॉमी करण्यात आली. या शस्त्रक्रियेद्वारे कर्करोगाची गाठ काढून किडनीचा उर्वरित निरोगी भाग जतन करण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची किडनीची कार्यक्षमता स्थिर राहिली. तसेच रक्तस्राव, लघवीची गळती किंवा संसर्ग यांसारखी कोणतीही गुंतागुंत झाली नसल्याचे रुग्णालयाने सांगितले.

# गरजू रुग्णांसाठी 'वैद्यकीय मदत कक्षा'ची स्थापना

## श्री साई सेवा मंदिर ट्रस्टचा उपक्रम; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्थिक अडचणींमुळे गंभीर आजारांवरील उपचार घेण्यात अडथळे येणाऱ्या गरजू रुग्णांना आर्थिक व वैद्यकीय सहाय्य मिळावे, या उद्देशाने श्री साई सेवा मंदिर ट्रस्टच्या वतीने 'वैद्यकीय मदत कक्षा'ची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या उपस्थितीत या कक्षाचे उद्घाटन झाले. "आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही गरजू रुग्णाला उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दानशूर नागरिक, वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक संस्था आणि CSRच्या माध्यमातून सहकार्य घेऊन अधिकाधिक रुग्णांना मदत केली जाईल," अशी माहिती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांनी दिली. या कक्षाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना औषधे, वैद्यकीय तपासण्या, उपचार व शस्त्रक्रियांसाठी आर्थिक मदत तसेच वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात येणार आहे. आयुष्मान भारत कार्ड, पुणे महानगरपालिकेचे शहरी गरीब कार्ड आणि इतर आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठीही सहकार्य केले जाणार आहे. विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचेही नियोजन आहे. उद्घाटनप्रसंगी डॉ. कुरुष कुर्मी, डॉ. अमित शहा, सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, आशिष सुपणार, मंगलदास माने, आरोग्य निरीक्षक संदीप खेराडे, जगन्नाथ पांचाळ उपस्थित होते. यावेळी जगन्नाथ पांचाळ यांनी ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर करून धनादेश ट्रस्टकडे सुपूर्द केला. कार्यक्रमास शिवाजी येवले, मुकुंद जोशी, माजी मुख्याध्यापिका संजीवनी मुंदडा, गोपाळ चिटणीस, मोकादाम अशोक साठे, संग्राम पवार, आप्पासाहेब सातपुते, अन्वर खान, अनंता भोईर, केदार जाधव, बाळासाहेब पोरे, आप्पासाहेब कोळेकर, सुरेश कोळेकर, प्रकाश चरवड, सुहास पवार, सुनील चरवड, विश्वजीत चरवड, नंदकिशोर गोसावी, अनंता कांबळे तसेच अन्य मान्यवर व नागरिक उपस्थित होते. गरजू रुग्णांच्या उपचारासाठी दानशूर नागरिकांनी पुढे येऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## भारताच्या १०० गिगावॅट पवन ऊर्जा उद्दिष्टाला बळ

- विंडर्जी इंडिया २०२६ मध्ये उत्पादन, सागरी पवन ऊर्जा आणि पुनर्बांधणीवर भर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताचे पवन ऊर्जा क्षेत्र स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांसोबतच उत्पादन, निर्यात आणि ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण औद्योगिक क्षेत्र म्हणून वेगाने विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर विंडर्जी इंडिया २०२६ या पवन ऊर्जा व्यापार मेळावा व परिषदेच्या आठव्या आवृत्तीचे आयोजन ७ ते ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान चेन्नई ट्रेड सेंटर येथे करण्यात येणार आहे. 'पवन – भारताच्या ऊर्जा लवचिकतेला बळ देणे' या संकल्पनेवर आधारित या आयोजनात देशाच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील उत्पादन क्षमता, निर्यात, सागरी पवन ऊर्जा, जुन्या प्रकल्पांचे पुनर्बांधणीकरण, कौशल्यविकास आणि पुरवठा साखळी यांसारख्या विषयांवर चर्चा होणार आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सहसचिव राजेश कुलहरी म्हणाले की, भारताचे ऊर्जा संक्रमण केवळ नवीन वीज क्षमता उभारण्यापुरते मर्यादित नसून, रोजगारनिर्मिती, उत्पादन निर्यात, ऊर्जा सुरक्षा आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणारी व्यापक औद्योगिक परिसंस्था उभारण्याच्या दिशेने सुरू आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताने ६.०५ गिगावॅट पवन ऊर्जा क्षमता नव्याने जोडली. आतापर्यंतची ही सर्वाधिक वार्षिक वाढ ठरली आहे. त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत देशाची एकूण स्थापित पवन ऊर्जा क्षमता ५८.५२ गिगावॅट झाली आहे.

## कोल्हेवाडीत भव्य रोजगार व स्वयंरोजगार मेळावा उत्साहात संपन्न

### दत्ताभाऊ कोल्हे व धनश्रीताई कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हेवाडी येथे भव्य रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासह स्वयंरोजगारासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळावे, हा या मेळाव्यामागील उद्देश होता. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष दत्ताभाऊ कोल्हे व नगरसेविका धनश्रीताई कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन पुण्यनगरीच्या महापौर मंजुषाताई नागपुरे आणि आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. मेळाव्यात रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध संधींबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. परिसरातील तरुण आणि नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी नगरसेविका जयश्रीताई भुमकर, मंडलाध्यक्ष विजय मते, रमेश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, अॅड. नरसिंह लगड, सचिन दांगट, निखिल दांगट, भगवान मोरे, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा मोरे, अभिजीत धावडे, उमेश सरपाटील, अशोक मते, अविनाश कोल्हे, नांदेड सिटीचे पीआय अतुल बोस, तुषार श्रीहरी पोकळे, सुजित कारले, अभय खंदळकर, गणेश गावंडे, प्रकाश आगाशे आणि राजाराम दुपरगुडे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर मंजुषाताई नागपुरे म्हणाल्या, "नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर पाठपुरावा करणे तसेच विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे जनसंपर्क कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल." आमदार भीमराव तापकीर म्हणाले, "कोल्हे दांपत्याने नागरिकांसाठी केलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे. रोजगार व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून अनेकांना संधी उपलब्ध होणार आहेत. त्यांच्या मी त्यांच्या पाठीशी नक्की आहे." अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक राज शिनारे यांनी केले.

## येरवडा खुल्या कारागृहात बाप्पांचे आगमन

### 'कैलास पर्वता'चा नयनरम्य देखावा, रफी म्युझिकल ग्रुपच्या सुरांनी बंदीवान मंत्रमुग्ध



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवडा खुले कारागृहात यंदाचा गणेशोत्सव उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येत आहे. कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि बंदीवानांनी एकत्र येत श्री गणेशाची भक्तिभावाने प्रतिष्ठापना केली. कारागृहाच्या सांस्कृतिक भवनात भगवान शंकर आणि कैलास पर्वतावर आधारित आकर्षक रोषणाईसह नयनरम्य देखावा साकारण्यात आला असून, तो सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

गणेशोत्सवानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कारागृहाला भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. १५ सप्टेंबर रोजी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, पुणेचे अध्यक्ष तथा निवृत्त न्यायाधीश अशोक भिल्लारे यांनी, तर १६ सप्टेंबर रोजी मुख्यालय सदर्न कमांड, पुणे येथील कमांड सायबर ऑपरेशन्स सपोर्ट विंगचे कर्नल आशिष सुतार यांनी उत्सवस्थळी भेट दिली.

दोन्ही मान्यवरांनी श्री गणरायाची आरती करून उपस्थित बंदीवानांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते पुण्यातील मोहम्मद रफी म्युझिकल ग्रुपच्या कलाकारांचे सादरीकरण. कलाकारांनी गजाननाची भक्तिगीते सादर करून संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. या संगीतमय कार्यक्रमाचा बंदीवानांनी मनमुराद आनंद घेतला. संगीताच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक ऊर्जा आणि उत्साह मिळाला.

महाराष्ट्र राज्याचे महासंचालक (कारागृहे व सुधारसेवा) डॉ. सुहास वारके, विशेष महानिरीक्षक योगेश देसाई आणि पश्चिम विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी रोप देऊन स्वागत केले.

यावेळी वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भाणवसे, निशा श्रेयकर यांच्यासह कारागृहातील अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने बंदीवान उपस्थित होते.

गणेशोत्सव आणि संगीतमय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्व. मोहम्मद रफी फॅन्स क्लबचे गायक मुराद काजी, कविता तरडे-फुगे, देवदत्त राजगुरू, किशोर गायकवाड, ख्वाजा शेख, संदीप काकडे, श्याम पाटील, दिगंबर गरुड, संजय सपकाळ, उर्मिला कावडे, राणी कुमारी, श्वेता देशपांडे आणि पंकज कुमार यांनी विशेष योगदान दिले.

## 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' जाहिरात मोहीम सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने प्रसिद्ध अभिनेते आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त आर. माधवन यांना ब्रँड अॅम्बेसेडर म्हणून नियुक्त करत 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' ही नवीन ब्रँड जाहिरात मोहीम सुरू केली आहे. २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ८०० हून अधिक शाखांच्या माध्यमातून एक कोटीहून अधिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या बँकेने आपल्या बदलत्या स्वरूपाची आणि व्यापक बँकिंग सेवांची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही मोहीम आखली आहे. 'स्मॉल' या शब्दामुळे बँकेच्या सेवा, कर्जाची रक्कम किंवा विस्तार मर्यादित असल्याची धारणा निर्माण होऊ शकते. ही धारणा बदलण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला आहे. बचत, ठेवी, वित्तपुरवठा,




व्यवसाय बँकिंग, परकीय चलन व्यवहार, अनिवासी भारतीय सेवा, गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन अशा विविध सेवा बँकेकडून उपलब्ध करून दिल्या जातात. बँकेच्या कर्ज सुविधांमध्ये ६ हजार रुपयांपासून २५० कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जांचा समावेश असल्याचे उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने म्हटले आहे. त्यामुळे विविध स्तरांवरील ग्राहकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँकेच्या सेवा उपलब्ध असल्याचा संदेश मोहिमेतून देण्यात आला आहे.

## प्रणती नायक आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार



**भुवनेश्वर (दै. आरंभ पर्व)**

भुवनेश्वर येथील ओडिशा एएम/एनएस इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटर (ओडिशा एएम/एनएस जीएचपीसी) मध्ये सराव करणारी ऑलिम्पिअन प्रणती नायक हिची जपानमधील आयची-नागोया येथे 19 सप्टेंबर ते 4 ऑक्टोबर दरम्यान आयोजित होणाऱ्या 20 व्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. प्रणती ही आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली एकमेव भारतीय जिम्नॅस्ट असून ती आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्समधील महिलांच्या व्हॉल्ट आणि महिलांच्या ऑल-अराउंड प्रकारांत भाग घेणार आहे. तिची ही निवड तिच्या सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरीनंतर झाली आहे, ज्यामध्ये ताश्कंद, उझबेकिस्तान येथे पार पडलेल्या एफआयजी वर्ल्ड चॅलेंज कप 2026 मध्ये महिलांच्या व्हॉल्ट प्रकारात जिंकलेल्या रौप्यपदकाचाही समावेश आहे. एएम/एनएस इंडियाचे संचालक आणि उपाध्यक्ष – एचआर व प्रशासन, आशुतोष तेलंग म्हणाले, "आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताची एकमेव जिम्नॅस्ट म्हणून प्रणतीची झालेली निवड ही एक अत्यंत महत्त्वाची उपलब्धी आहे आणि हे तिचे सातत्य, शिस्त व दृढनिश्चय दर्शवते. ओडिशा एएम/एनएस इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये खेळाडूंना सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण आणि साहाय्य उपलब्ध करून देण्यावर आमचा भर असतो.

# अनैतिक मानवी व्यापार करणाऱ्या दोघांना अटक

### *दोन महिलांची सुटका : येरवडा पोलिसांची कारवाई; खराडी परिसरातून आरोपी ताब्यात*




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनैतिक मानवी व्यापारासाठी महिलांना प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांकडे पाठविणाऱ्या दोघांना येरवडा पोलिसांनी अटक केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. खराडी परिसरातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनैतिक मानवी व्यापार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले होते. त्यानुसार पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत असताना पोलीस हवालदार रामेश्वर नवले यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, येरवडा परिसरातील एका हॉटेलमधून ग्राहकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून महिलांना अनैतिक व्यापारासाठी पाठविले जात आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार कल्याणीनगर, येरवडा परिसरातील लॉजमध्ये महिलांना पाठवून त्याबदल्यात ठरावीक रक्कम घेतली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गिते यांना देण्यात आली. त्यांनी तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी माहितीची पडताळणी केली. त्यानंतर बनावट ग्राहकाच्या माध्यमातून संबंधित हॉटेलमध्ये कारवाईचे नियोजन करण्यात आले. पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला असता अनैतिक व्यापारासाठी प्रवृत्त करण्यात आलेल्या दोन महिलांची सुटका करण्यात आली.

सुटका करण्यात आलेल्या महिलांकडे चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे हा व्यवसाय करवून घेणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात आला. तपास पथकाने अप्पर खराडी रोड परिसरात सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची नावे राज राजेशाम सविता (वय २८, रा. खराडी, पुणे) आणि सुनिल शिवाजी शिंदे (वय ३७, रा. काळेपडळ, हडपसर, पुणे) अशी आहेत.

या प्रकरणी १४ सप्टेंबर २०२६ रोजी येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३५०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## NCMC स्मार्ट कार्ड व शासकीय योजना मार्गदर्शन अभियान संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : एकतन निवास धनगर वस्ती धायरी खडकवासला या ठिकाणी अनुलोम संस्थेच्या वतीने NCMC कार्ड कॅम्प घेण्यात आले या ठिकाणी सरस्वती पूजन करून सर्व प्रभावशाली व्यक्ती व अनुलोम मित्र यांचा सत्कार करण्यात आला त्याचप्रमाणे सर्व आलेल्या महिलांना सौ नयन चव्हाण खडकवासला भाग जनसेविका यांनी शासकीय योजनांची माहिती दिली यापुढे शासकीय योजना मार्गदर्शन व सेवा शिबिर राबवण्यात येणार असून दुर्लक्षित भागातील लोकांना याचा फायदा होणार आहे कॅम्पला भरभरून प्रतिसाद मिळाला या ठिकाणी 123 कार्ड काढण्यात आले त्यात जेष्ठ नागरिक व महिला उपस्थित होत्या या कार्यक्रमासाठी सौ.रोहिणीताई राहणे , तसेच सामाजिक कार्यकर्ते व अनुलोम मित्र श्री.तानाजी कांबळे, श्री दिलीप रायकर सौ.नागरताई जाधव, सौ.भारतीताई लोहकरे,सौ.तृप्तीताई देशमुख, सौ.योगिताताई सह्याद्रीकर, कु.एकतन देशमुख, श्री.निलेशदादा पोकळे इ. उपस्थित होते. परिसरातील ज्येष्ठ नागरिक व महिला यांनी या या विशिष्ट प्रकारच्या अभियानाबद्दल समाधान व्यक्त केले सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिर स लाभ घेतला.



## गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर आपदा मित्रांची कार्यशाळा

जुन्नर (आरंभ पर्व) : गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष तथा तहसिलदार रणजित भोसले यांनी तालुक्यातील आपदा मित्रांची आपत्कालीन एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळाआयोजित केली होती. गणपती विसर्जन २०२६ च्या अनुषंगाने नदी, तलावाच्या पाणी साठ्यात पडणे, धरणात बुडणे, नदीच्या वाहत्या प्रवाहात वाहून जाणे इत्यादी आपत्तीच्या घटना वारंवार घडत असतात. त्यामुळे अशा घटनांना तात्काळ प्रतिसाद देणे बचाव कार्य करून जीव वाचवणे आवश्यक असल्याने या आपत्कालीन परिस्थितीवर एक दिवसीय प्रशिक्षण शुक्रवार दि. १८ रोजी वडज धरण ता. जुन्नर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण संदर्भात तहसील ऑफिस नायब तहसीलदार रोहिदास सुपे, कर्मचारी संजय लोखंडे व कोरडे पोलीस पाटील सचिन शिंदे, योगेश सोनवणे, आपदा मित्र सुशांत भुजबळ, भरत मुठे, सागर चव्हाण, राजकुमार चव्हाण आदी यावेळी उपस्थित होते. तालुक्यात महत्त्वाच्या ठिकाणी गणपती विसर्जनाच्या अनुषंगाने पाण्यात बुडणे, वाहून जाणे अशा घटना वारंवार घडत असतात यात निष्पाप जीव जाऊ शकतो त्यामुळे अशा घटनांना तात्काळ प्रतिसाद देणे व जीव वाचविणे आवश्यक असल्याने हे प्रशिक्षण घेण्यात आले असल्याचे आपदा मित्र सुशांत भुजबळ यांनी सांगितले. ह्या प्रशिक्षणाबद्दल आपदा मित्रांनी समाधान व्यक्त केले.



## संत सावता माळी तरुण मंडळाच्या गणरायाची राजेंद्र पवार यांच्या हस्ते आरती

कोल्हेवाडी (आरंभ पर्व) : कोल्हेवाडी येथील संत सावता माळी तरुण मंडळाच्या गणेशोत्सव सोहळ्यात श्री गणरायाची आरती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेडचे संचालक राजेंद्रजी पवार यांच्या शुभहस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्री गणरायाचे दर्शन घेत आरतीमध्ये सहभाग घेतला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, सांस्कृतिक परंपरा आणि बंधुभाव जपण्याचे कार्य मंडळाच्या माध्यमातून केले जात असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमास नगरसेविका धनश्रीताई कोल्हे, प्रदेश भाजप ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ कोल्हे, सामाजिक कार्यकर्ते रमेश बापू गायकवाड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते आणि मंडळाचे अध्यक्ष अजय कोल्हे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजेंद्र पवार यांनी मंडळाच्या गणेशोत्सव आयोजनाचे कौतुक करत उपस्थित कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सव हा भक्तीबरोबरच सामाजिक सलोखा आणि एकतेचा संदेश देणारा उत्सव असल्याचे त्यांनी सांगितले. आरतीच्या वेळी परिसरातील नागरिक व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात आरती संपन्न झाल्यानंतर उपस्थितांनी श्री गणरायाचे दर्शन घेतले.

## रिअल इस्टेट क्षेत्र आणि सरकारमध्ये थेट संवाद




पुणे (आरंभ पर्व) : क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने 'क्रेडाई महाराष्ट्र मॅनेजिंग कमिटी आणि क्रेडाई महा संवाद मीटिंग 2026'चे आयोजन 27 ऑगस्ट 2026 रोजी पुण्यातील हयात रीजन्सी येथे करण्यात आले. या एकदिवसीय कार्यक्रमात महाराष्ट्रातील 45 शहरांमधून 300 हून अधिक क्रेडाई सदस्यांनी सहभाग घेतला. रिअल इस्टेट क्षेत्रासमोरील प्रशासकीय, तांत्रिक, नियामक आणि धोरणात्मक अडचणी वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमोर थेट मांडून त्यांच्या व्यावहारिक उपाययोजनांवर चर्चा करणे हा महा संवादाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाचे नेतृत्व क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल तावरे यांनी केले. यावेळी मानद सचिव श्री. आशीष पोखरणा यांच्यासह क्रेडाई महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी आणि राज्यातील विविध शहरांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्नरला आदिवासी शिक्षण संस्थेच्या वसतिगृहातून तीन विद्यार्थी बेपत्ता

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

आदिवासी शिक्षण संस्थेच्या जुन्नर येथील कृष्णराव मुंढे विद्यालय तसेच वसतिगृहातून तीन विद्यार्थ्यांना अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले असल्याची तक्रार जुन्नर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.



संस्थेच्या शाळेत अकरावीत शिकत असलेला ओंकार नामदेव माळी, वय १६, मुळ रा.कोपरे ता.जुन्नर जि.पुणे सध्या रा.भाऊसाहेब राऊत विद्यार्थी वसतिगृह जुन्नर तसेच सौरव दत्तू डामसे वय १५ मुळ रा. कोपरे ता. जुन्नर जि पुणे व ज्ञानेश्वर बुधा दाभाडे वय १४ रा मांडवे ता. जुन्नर, दोघे सद्या रा.महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृह जुन्नर अशी मुलांची नावे असून सर्वजण आदिवासी समाजाचे अल्पवयीन विद्यार्थी आहेत.ओंकार याचे वडील नामदेव पांडुरंग माळी यांनी याबाबतची फिर्याद दिली आहे. माळी यांचा मुलगा ओंकार संस्थेच्या अनुदानित आश्रमशाळेत जुन्नर येथे शिकत आहे. ओंकार दिं.२९ व ३० ऑगस्ट २६ रोजी वसतिगृहातून दोन दिवस रजेचा अर्ज देवून घरी आला होता. तो ३१ ऑगस्टला हा कोपरे ते जुन्नर येथे बसने नेहमीप्रमाणे शाळेत गेला. महात्मा फुले विद्यार्थी वसतिगृहाचे अधीक्षक पाचपुते यांनी दिं.१ सप्टेंबर रोजी रात्री मोबाईलवरून फोन करून तुमचा मुलगा ओंकार तसेच सौरव दत्तू डामसे व ज्ञानेश्वर बुधा दाभाडे रा मांडवे ता. जुन्नर जि पुणे असे तिघेही सकाळपासून दिसलेले नाही तसेच ते गैरहजर असल्याचे कळविले.यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी महात्मा फुले वसतिगृहात आलो असता मुलाचा मित्र सौरव याचे वडील दत्तू खंडू डामसे भेटले त्यानंतर आमची दोघांची शाळेतील शिक्षकाशी व दोन्ही वसतिगृहाचे अधीक्षक यांचेशी तिन्ही मुलांबाबत विचारणा केली असता ते गैरहजर असल्याबाबत सांगण्यात आले. त्यानंतर मी व सौरवच्या वडिलानी तीनही मुलांचा जुन्नर शहरात, आजुबाजुला व नातेवाईकांकडे शोध घेतला असता तिघेही कोठेही मिळुन आले नाही.यानंतर पोलिसांकडे फिर्याद देण्यात आली. तिघाचे वर्णन खालीलप्रमाणे :- ओंकार नामदेव माळी, वय १६, वर्षे, उंची ५ फुट, रंग गोरा, चेहरा- गोल, केस काळे व आकाराने बारीक, नाक-सरळ, बांधा-सडपातळ, नेसणीस- निळ्या रंगाची जिन्स व लाल रंगाचा फुल बाहीचा शर्ट, पायात काळ्या रंगाची चप्पल, मराठी भाषा बोलतो.

सौरव दत्तू डामसे वय १५, शिक्षण १० वी, उंची ४.५फुट, रंग- निमगोरा, चेहरा- गोल, केस काळे व आकाराने बारीक, नाक-सरळ, बांधा-सडपातळ, नेसणीस- काळ्या रंगाची साधी पँन्ट व पांढ-या रंगाचा फुल बाहीचा शर्ट पायात काळ्या रंगाची चप्पल, मराठी भाषा बोलतो. ज्ञानेश्वर बुधा दाभाडे वय 14 शिक्षण ९ वी. उंची ४.५ फुट, रंग गोरा, चेहरा उभट, केस काळे व आकाराने बारीक, नाक-सरळ, बांधा-सडपातळ, नेसणीस- काळ्या रंगाची साधी पॅन्ट व पांढ-या रंगाचा फुल बाहीचा शर्ट पायात काळ्या रंगाची चप्पल, मराठी भाषा बोलतो.

विद्यार्थी बेपत्ता होऊन अनेक दिवस झाल्यानंतरही मुलांचा शोध न लागल्याने संतप्त पालकांनी वसतिगृह चालकाला घेराव घालत जाब विचारला. यावेळी पालकांनी आपल्या मुलांच्या शोधासाठी तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी केली. यावेळी "आमची मुले आम्हाला द्या," म्हणत पालकांनी आक्रोश केला.19 दिवस झाले, पोरं बेपत्ता आहेत. शिक्षणासाठी मुलांना वसतिगृहात पाठवले होते. पुढील दोन दिवसांत विद्यार्थ्यांचा शोध लागला नाही, तर कोपरे-मांडवे भागातील आदिवासी बांधव जुन्नर पोलिस स्टेशनसमोर आंदोलन करणार असा इशारा पालकांनी दिला आहे. विद्यार्थी नेमके कुठे गेले, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही.ही मुले कुणाला आढळून आल्यास जुन्नर पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधावा. सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मोरे पुढील तपास करत आहेत.

## केसांच्या समस्यांचे मूळ स्कॅल्पमध्ये

### 'केश किंग'ची 'स्कॅल्प फर्स्ट' संकल्पना

**कोलकाता (दै. आरंभ पर्व)**

केस गळणे, कोंडा, कोरडेपणा, केसांचे नुकसान आणि स्कॅल्पशी संबंधित विविध समस्यांवर उपाय म्हणून बाजारात अनेक हेअर-केअर उत्पादने उपलब्ध आहेत. मात्र, विविध उपाय करूनही अनेक ग्राहक केसांच्या समस्यांमुळे त्रस्त असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर ईमामी लिमिटेडच्या हेअर-केअर ब्रँड 'केश किंग'ने 'स्कॅल्प फर्स्ट' ही संकल्पना सादर केली आहे. निरोगी केसांची सुरुवात त्यांच्या मुळापासून होते आणि केसांच्या मुळांसाठी निरोगी स्कॅल्प महत्त्वाचा असतो, या विचारावर 'स्कॅल्प फर्स्ट' ही संकल्पना आधारित आहे. स्कॅल्पचे नैसर्गिक पीएच संतुलन राखणे हे निरोगी स्कॅल्प वातावरणासाठी महत्त्वाचे पाऊल असल्याचे ब्रँडने नमूद केले आहे. केश किंगने पुरुष आणि महिलांसाठी स्कॅल्पच्या विविध गरजा लक्षात घेऊन दोन स्वतंत्र श्रेणी सादर केल्या आहेत. 'ऑइली स्कॅल्प रेंज'मध्ये डिटॉक्सिस्कॅल्प, मोरिंगा आणि ॲपल सायडर व्हिनेगर यांचा समावेश आहे. ही श्रेणी स्कॅल्पवरील अतिरिक्त तेल, साचलेले सीबम, खाज आणि रोमछिद्रे बंद होण्यासारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित करते. तर 'ड्राय स्कॅल्प रेंज'मध्ये मोरिंगा, डाळिंब आणि स्कॅल्पकॅल्मिन यांचा समावेश करण्यात आला आहे. ही श्रेणी स्कॅल्पला पोषण आणि थंडावा देण्यासोबत कोरडेपणा, त्वचेवर येणारे पापुद्रे आणि स्कॅल्पमध्ये जाणवणारा ताण यांसारख्या समस्यांसाठी तयार करण्यात आली आहे.





## पत्रकार बांधवांच्या शुभहस्ते गणपती आरती उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डिजिटल पुणे न्यूज आणि व्हि. पी. पॉलीफॅब प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त गणपती बाप्पाच्या आरतीचे आयोजन करण्यात आले. सिंहगड पत्रकार संघातील पत्रकार बांधवांच्या शुभहस्ते सकाळी ठीक १०.३० वाजता ही आरती भक्तिमय वातावरणात पार पडली. यावेळी व्हि. पी. पॉलीफॅब प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर महेश कुगावकर, गजानन मेनकुदळे, सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, सकाळचे निलेश चांदगुडे, लोकमतचे कल्याण आवताडे, विजन महाराष्ट्रचे प्रकाश यादव, प्रभातचे विशाल भालेराव,दैनिक आरंभपर्व पुणेचे निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांच्यासह पत्रकार संघातील पत्रकार बांधव व मान्यवर उपस्थित होते. यावेळी पत्रकार बांधवांनी कंपनीविषयी माहिती जाणून घेतली. कंपनीच्या कार्याची आणि उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. यावेळी बोलताना सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी आपल्या प्रगल्भ शैलीत मनोगत व्यक्त केले. त्यांनी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत पत्रकार बांधव आणि कंपनी यांच्यातील स्नेहपूर्ण संबंधांचे कौतुक केले. गणपती बाप्पाच्या आरतीनंतर उपस्थितांनी एकमेकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. पत्रकार बांधवांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उत्साहाचे आणि आपुलकीचे स्वरूप प्राप्त झाले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.

## मंडळांच्या एकजुटीतून नऱ्हेतील अंगणवाडीला मिळणार नवे रूप

### *गणेश, नवरात्र व दहीहंडी मंडळांच्या सहकार्याने दुरुस्ती व सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे धायरी आणि धायरी फाटा परिसरातील विविध गणेश मंडळे, नवरात्र मंडळे आणि दहीहंडी मंडळांच्या सामूहिक सहकार्याने मानाजीनगर अंगणवाडीच्या दुरुस्ती व सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. परिसरातील लहान मुलांना चांगल्या सुविधा मिळाव्यात आणि अंगणवाडीला नव्या स्वरूपात उभारी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



नऱ्हेतील मानाजीनगर येथील अंगणवाडीची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन माजी. उपसरपंच सुशांत कुटे यांनी अंगणवाडीच्या दुरुस्ती व सुशोभीकरणाची संकल्पना परिसरातील विविध मंडळांसमोर मांडली. त्यांच्या आवाहनाला मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या सामाजिक उपक्रमासाठी मोलाचे योगदान देण्याचे ठरविले. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दहीहंडीच्या माध्यमातून परिसरात सामाजिक एकोपा जपणाऱ्या मंडळांनी यावेळी एकत्र येत लहान मुलांच्या भविष्यासाठी सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श निर्माण केला आहे. अंगणवाडीच्या दुरुस्तीबरोबरच परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि मुलांसाठी आनंददायी करण्याच्या दृष्टीने सुशोभीकरण करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी एकत्र आलेल्या सर्व मंडळांचे, त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच कार्यकर्त्यांचे माजी उपसरपंच सुशांत कुटे यांनी मनःपूर्वक आभार मानले. मंडळांच्या सहकार्यामुळे मानाजीनगर अंगणवाडीला लवकरच नवे आणि आकर्षक रूप मिळणार असून, त्याचा लाभ परिसरातील चिमुकल्यांना होणार आहे.

## 'राइज अँड फॉल सीझन २' २६ सप्टेंबरपासून प्राइम व्हिडिओ आणि एमएक्स प्लेयरवर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

सत्तेची बदलती समीकरणे, रणनीती, स्पर्धकांमधील संघर्ष आणि अनपेक्षित वळणांनी भरलेला 'राइज अँड फॉल सीझन २' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बनिजय एशियाची निर्मिती असलेल्या या एमएक्स ओरिजिनल शोचा पहिला प्रोमो प्रदर्शित झाला असून, त्यातून पहिल्या चार स्पर्धकांची ओळख करून देण्यात आली आहे. स्वरा भास्कर, शहजाद पूनावाला, प्रियांका चाहर चौधरी आणि करण पटेल हे या नव्या पर्वात सहभागी होणार आहेत. भारतीय क्रिकेटमधील माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत. सत्तेच्या या खेळात आजचा 'रूलर' उद्या 'वर्कर' होऊ शकतो, अशी या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. त्यामुळे प्रत्येक निर्णय, रणनीती आणि बदलती समीकरणे स्पर्धकांसाठी महत्त्वाची ठरणार आहेत. नव्या पर्वात एकूण १५ स्पर्धक सहभागी होणार असून, २६ सप्टेंबरपासून सलग ४२ दिवस हा कार्यक्रम प्रेक्षकांना पाहता येणार आहे. प्रोमोमध्ये स्वरा भास्कर, शहजाद पूनावाला, प्रियांका चाहर चौधरी आणि करण पटेल आपापल्या खास शैलीत सत्तेच्या खेळात उतरताना दिसतात.




## आधार हाउसिंग फायनान्सच्या पुण्यातील एकूण शाखांची संख्या पोहोचली १८ वर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेडने (एएचएफएल) पुणे शहरात तीन नवीन शाखांच्या उद्‌घाटनाची घोषणा केली आहे. या नवीन शाखा बावधन, शिक्रापूर आणि सासवड येथे सुरू करण्यात आल्या आहेत. या विस्तारामुळे पुण्यातील कंपनीच्या एकूण शाखांची संख्या १८ वर पोहोचली आहे, तसेच देशभरातील नेटवर्क ६३० हून अधिक शाखांपर्यंत विस्तारले आहे. या नवीन शाखांमुळे या भागातील ग्राहकांसाठी आधारची पोहोच अधिक सुलभ होईल, तसेच अल्प उत्पन्न गट (एलआयजी) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना परवडणारे गृहकर्ज प्रदान करण्याप्रती कंपनीची कटिबद्धता अधिक दृढ होईल. तिन्ही ठिकाणी उद्‌घाटन समारंभ पार पडले. या कार्यक्रमांना चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. अनिल नायर, चीफ बिझनेस लीडर श्री. सत्यम वर्मा आणि कंपनीचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुण्यातील निवासी बाजारपेठ सातत्याने प्रगती करत आहे, रोजगाराच्या नवीन संधी, पायाभूत सुविधांचा विकास आणि निवासी क्षेत्रांचा विस्तार याला हातभार लावत आहे. जून २०२६ अखेर संपलेल्या १२ महिन्यांत शहरातील घरांची विक्री वार्षिक ७ टक्के वाढ होऊन ९२,३४१ युनिट्सवर पोहोचली, तर नवीन निवासी प्रकल्पांच्या लॉंचमध्ये १४ टक्के वाढ होऊन १,०१,०८५ युनिट्सवर गेली. घरांच्या विक्री आणि लॉंचमधील ही वाढ प्रस्थापित, तसेच नव्याने विकसित होणाऱ्या भागांमधील घरांची सातत्यपूर्ण मागणी दर्शवते, तसेच स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी परवडणाऱ्या गृहकर्जाचे महत्त्व स्पष्ट करते.



## मधली तालीम ट्रस्टच्या

# गणरायाची राजेंद्र पवार यांच्या हस्ते आरती

- आकर्षक देखाव्याचे केले कौतुक
- राज्यातील नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला येथील मधली तालीम ट्रस्टच्या श्री गणरायाची आरती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेडचे संचालक राजेंद्रजी पवार यांच्या शुभहस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी ट्रस्टचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच महावितरणचे अधिकारी उपस्थित होते. आरतीनंतर बोलताना राजेंद्र पवार यांनी मधली तालीम ट्रस्टच्या वतीने साकारण्यात आलेल्या आकर्षक देखाव्याचे विशेष कौतुक केले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव असल्याचे त्यांनी नमूद केले. गणरायाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा, एकोपा आणि बंधुभाव वाढावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. तसेच महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



या कार्यक्रमास स्वप्निल मते (अध्यक्ष), विजय मते (मंडल अध्यक्ष, भाजप), रमेशबापू गायकवाड (सामाजिक कार्यकर्ते), अनिल मते (उपजिल्हाध्यक्ष), नितीन मते (सीडब्ल्यूपीआरएस चेअरमन), सतीश मते (उपाध्यक्ष), प्रसाद मते, शैलेश मते, अभिजीत मते, अविनाश तिकोणे, सुमित पिंगळे, उमेश वसवे (महाराष्ट्राचा खली), अक्षय मते, नंदकुमार मते (माजी सरपंच), यश मते, श्लोक मते, सागर मते, चारुदत्त लोखंडे, नवनाथ तावरे, गणेश हगवणे आणि नितीन गोरे आदी उपस्थित होते. तसेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता अविनाश कालढोणे, सहाय्यक अभियंता योगेश कराळे, त्रिंबक आव्हाड आणि सागर दुधे यांचीही उपस्थिती होती. गणरायाच्या आरतीनंतर उपस्थित मान्यवरांनी ट्रस्टच्या गणेशोत्सवातील उपक्रमांची पाहणी केली. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला.



दै. आरंभ पर्व ४थ्या वर्धापनदिनाची क्षणचित्रे





















# ‘भूतम् भयम्’मधून भय, विनोद आणि रहस्याचा भन्नाट संगम

## २५ सप्टेंबरपासून केवळ मराठी झी५वर अलौकिक साहसाचा थरार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ असलेला ‘भूतम् भयम्’ हा मराठी चित्रपट २५ सप्टेंबर २०२६पासून केवळ मराठी झी५वर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रामचंद्र गावकर यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या चित्रपटातून त्यांचे दिग्दर्शकीय पदार्पण होत आहे. नेहमीच्या भयपटांपेक्षा वेगळी कथा, धमाल व्यक्तिरेखा आणि अनपेक्षित वळणांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांसाठी वेगळा अलौकिक अनुभव ठरणार आहे.

झी स्टुडिओज मराठी प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्सच्या बॅनरखाली निर्मित **‘भूतम् भयम्’**मध्ये छाया कदम, पुष्कराज चिरपुटकर, करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, सिद्धांत सरफरे, मनमीत पेम आणि प्रियदर्शन जाधव यांच्या भूमिका आहेत.




चित्रपटाची कथा सात बेरोजगार मित्रांभोवती फिरते. त्यांच्या हाती एक रहस्यमय प्राचीन नाणे लागते. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती या नाण्यात असल्याचे समोर आल्यानंतर हे मित्र झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहू लागतात.

### चित्रपटाची ठळक वैशिष्ट्ये

- भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा संगम
- कोणतीही वस्तू सोन्यात बदलणाऱ्या प्राचीन नाण्याभोवती फिरणारी कथा
- ‘राणीवाडा’च्या गूढ आणि भयावह जगाची सफर
- सात मित्र आणि शतकानुशतके जुन्या शापातील संघर्ष
- मैत्री, लोभ आणि जगण्यासाठीची धडपड यांचा वेध
- रामचंद्र गावकर यांचे दिग्दर्शकीय पदार्पण
- भयावह प्रसंगांसोबत विनोद आणि अनपेक्षित वळणांची मेजवानी

मात्र, संपत्तीच्या हव्यासातून सुरू झालेला हा प्रवास त्यांना ‘राणीवाडा’ नावाच्या ओसाड आणि गूढ हवेलीपर्यंत घेऊन जातो.

या हवेलीच्या भिंतींआड शतकानुशतके जुना शाप दडलेला असतो. नाण्याचे रहस्य उलगडत असतानाच त्यांचा मित्र गजा अचानक बेपत्ता होतो आणि त्यानंतर परिस्थिती अधिकच भयावह बनते. अलौकिक शक्तींशी सामना करताना या मित्रांना मैत्री, लोभ आणि जगण्यासाठीची धडपड यांचा सामना करावा लागतो. भयावह प्रसंगांसोबतच विनोदाची फोडणी देत चित्रपटाची कथा पुढे सरकते. त्यामुळे प्रेक्षकांना एका क्षणी भीतीचा अनुभव देणारे प्रसंग, तर दुसऱ्याच क्षणी हसवणारे प्रसंग पाहायला मिळणार आहेत. रहस्य, साहस आणि अनपेक्षित घटनांमुळे पुढे काय घडणार याची उत्सुकता कायम राहणार आहे. दिग्दर्शक रामचंद्र गावकर यांनी सांगितले की, भय, विनोद आणि साहस यांची सांगड घालत प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी कथा साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# मामाची हत्या करुन भाच्याने केली आत्महत्या

## खळबळजनक घटनेची शहरात चर्चा

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

धारदार कोयत्याने वार करून आजारी मामाचा भाच्याने खून केला. नंतर घटनास्थळीच भाच्यानेही गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना राजगुरूनगर शहरातील माधवनगर भागात शनिवारी (दि. १९) घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. संदीप वामन गडदे (वय ४३) असे खून झालेल्या मामाचे नाव आहे तर, प्रवीण कैलास कोहिणकर (वय २०) असे आत्महत्या केलेल्या भाच्याचे नाव आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीप गडदे हे गेल्या काही महिन्यांपासून आजाराने ग्रस्त होते. उपचार तसेच देखभालीसाठी ते दोन महिन्यांपासून माधवनगर येथील भाचा प्रवीण कोहिनकर याच्या घरी राहण्यासाठी आले होते. मात्र, शनिवारी सकाळी अचानक प्रवीणने धारदार कोयत्याने संदीप गडदे यांच्या गळ्यावर वार केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या संदीप यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यानंतर प्रवीणने त्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या



केली. एकाच घरात मामाचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आणि भाच्याचा गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करताना पोलिसांना प्रवीणने आत्महत्येपूर्वी लिहिलेली चिठ्ठी मिळाली, त्यामध्ये 'मामाच्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलत आहे,' असा उल्लेख असल्याची माहिती पोलिसांनी दिली. खेड पोलिस घटनास्थळावरील इतर पुराव्यांचा शोध घेत आहेत. पोलीसांनी दोन्ही मृतदेह चांडोली ग्रामिण रुग्णालयात शवविच्छेदनाकरीता पाठविले आहेत. पुढील तपास खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण करीत आहेत.

• वर्ष : ०४ • अंक : ००८ • पुणे • गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313




# ‘आरंभपर्व’चा चौथा वर्धापन दिन उत्साहात

**• ‘आरंभपर्व’ने सर्वसामान्यांना दिले हक्काचे व्यासपीठ • पत्रकार भवन उभारणीसाठी सहकार्य करण्याचे आमदार भीमराव तापकीर यांचे आश्वासन**

**प्रमुख उपस्थिती** आमदार भीमराव तापकीर | नगरसेवक तथा गटनेते काकासाहेब चव्हाण | नगरसेवक श्रीकांत जगताप | सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई | पत्रकार मिलिंद पानसरे | संपादिका सुरेखा मते | नितीन वाघ | नगरसेवक दत्ताभाऊ कोल्हे | यशवंत लायगुडे | सारंग नवले | निवासी संपादक लक्ष्मण साबळे | व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे | मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com









## ‘आरंभपर्व’ने नागरिकांना व्यासपीठ दिले आमदार भीमराव आण्णा तापकीर



नागरिकांच्या प्रश्नांना आणि स्थानिक विषयांना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण काम दैनिक आरंभपर्वने केले आहे. गेल्या चार वर्षांपासून खडकवासला मतदारसंघात या वृत्तपत्राची स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून, आगामी काळातही हे काम अधिक व्यापक व्हावे, अशा शुभेच्छा आमदार तापकीर यांनी दिल्या. स्थानिक नागरिकांच्या समस्या, परिसरातील विकासकामे, सामाजिक उपक्रम आणि विविध प्रश्न सातत्याने माध्यमातून पुढे आणणे ही लोकशाहीतील महत्त्वाची भूमिका आहे. आरंभपर्वने गेल्या चार वर्षांत ही भूमिका बजावल्याचेही तापकीर यांनी सांगितले.

## ‘आरंभपर्व’कडून स्थानिक विषयांना विशेष व्यासपीठ : श्री. काकासाहेब चव्हाण

पुणे शहर, खडकवासला, सिंहगड परिसर तसेच उपनगरांमधील स्थानिक प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचे काम दैनिक ‘आरंभपर्व’च्या माध्यमातून केले जात आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विषयांना प्राधान्य देत त्यांच्या समस्या प्रशासन आणि संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविण्यासाठी ‘आरंभपर्व’ने विशेष व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे काकासाहेब चव्हाण यांनी सांगितले. दैनिक ‘आरंभपर्व’च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी ‘आरंभपर्व’च्या चार वर्षांच्या वाटचालीचे कौतुक करत संपादक, पत्रकार आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. काका चव्हाण म्हणाले, “पुणे शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना शहराच्या विविध भागांमध्ये अनेक नवे प्रश्न निर्माण होत आहेत. रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा, नागरी नियोजन यांसह नागरिकांच्या रोजच्या जीवनाशी संबंधित अनेक प्रश्न असतात. या प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळणे आणि ते प्रशासनापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. दैनिक ‘आरंभपर्व’ने स्थानिक विषयांना महत्त्व देत ही भूमिका प्रभावीपणे पार पाडली आहे.” “विशेषतः पुणे शहर आणि सिंहगड परिसरातील अनेक स्थानिक प्रश्नांना ‘आरंभपर्व’मधून प्रसिद्धी मिळते. नागरिकांच्या समस्या, स्थानिक पातळीवरील घडामोडी आणि सामाजिक उपक्रम यांना स्थान देत या वृत्तपत्राने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्थानिक प्रश्नांवर सातत्याने प्रकाश टाकल्यामुळे नागरिकांमध्येही या वृत्तपत्राबद्दल आपलेपणाची भावना निर्माण झाली आहे,” असे त्यांनी नमूद केले. गेल्या चार वर्षांच्या काळात ‘आरंभपर्व’ने केलेली वाटचाल उल्लेखनीय असल्याचे सांगत चव्हाण यांनी पुढे म्हटले की, “वृत्तपत्राचा प्रवास हा केवळ चार वर्षांचा कालावधी नसून त्यामागे असलेली मेहनत, संघर्ष, सातत्य आणि वाचकांचा विश्वास यांचे हे फलित आहे. कोणत्याही माध्यम संस्थेसाठी वाचकांचा विश्वास ही सर्वांत मोठी ताकद असते. ‘आरंभपर्व’ने हा विश्वास निर्माण केला असून आगामी काळात तो अधिक दृढ करण्यासाठी टीमने प्रयत्नशील राहावे.”

## ‘आरंभपर्व’ घरातील वृत्तपत्र : तृप्तीताई देसाई

दैनिक ‘आरंभपर्व’ हे केवळ बातम्या देणारे वृत्तपत्र न राहता सर्वसामान्यांच्या सुख-दुःखाशी, त्यांच्या प्रश्नांशी आणि दैनंदिन जीवनाशी जोडले गेले आहे. त्यामुळे ‘आरंभपर्व’ वाचताना ते आपल्या घरातीलच वृत्तपत्र असल्याची भावना निर्माण होते, असे सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांनी सांगितले. दैनिक ‘आरंभपर्व’च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी ‘आरंभपर्व’च्या आजवरच्या वाटचालीचे कौतुक करत वृत्तपत्राच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. तृप्ती देसाई म्हणाल्या, “एखादे वृत्तपत्र सुरू करणे आणि ते सातत्याने चालवणे ही सोपी गोष्ट नाही. शून्यातून सुरुवात करून आज ‘आरंभपर्व’ने निर्माण केलेले स्थान ही त्यामागील टीमच्या मेहनतीची, चिकाटीची आणि पत्रकारितेवरील विश्वासाची पावती आहे. अल्पावधीत या वृत्तपत्राने सर्वसामान्य वाचकांशी आपले नाते निर्माण केले आहे. त्यामुळे ‘आरंभपर्व’ हातात घेतल्यानंतर ते बाहेरचे वृत्तपत्र न वाटता आपल्या घरातीलच एक सदस्य असल्यासारखे वाटते.” “समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज प्रशासन आणि संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे ही माध्यमांची महत्त्वाची जबाबदारी आहे. ‘आरंभपर्व’ ही जबाबदारी सातत्याने पार पाडताना दिसते. विशेषतः तळागाळातील नागरिकांच्या समस्या, परिसरातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, वाहतूक, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य तसेच सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांना वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळते. एखाद्या सामान्य नागरिकाचा प्रश्न वृत्तपत्राच्या माध्यमातून मांडला जातो आणि त्याची दखल घेतली जाते, तेव्हा पत्रकारितेचे खरे सामाजिक महत्त्व अधोरेखित होते,” असेही त्यांनी नमूद केले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर, खडकवासला आणि सिंहगड रोड परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारे आणि गेल्या चार वर्षांत वाचकांच्या पसंतीस उतरलेले दैनिक आरंभपर्व पुणे यांचा चौथा वर्धापन दिन सोहळा धायरी फाटा येथील सिल्वर पेटल्स हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात सिंहगड, खडकवासला आणि परिसरातील पत्रकारांसाठी सुसज्ज पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू, असे आश्वासन आमदार भीमराव तापकीर यांनी दिले. सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी पत्रकार भवनाची मागणी मांडल्यानंतर आमदार तापकीर यांनी या मागणीची गांभीर्याने दखल घेत सहकार्य करण्याची ग्वाही दिली. त्यामुळे वर्धापन दिन सोहळ्यात पत्रकार भवनाचा मुद्दा विशेष चर्चेचा ठरला.

आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यास राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. ‘आरंभ एका नव्या पर्वाचा’ हे




ब्रीद घेऊन सुरू झालेल्या या दैनिकाने अल्पावधीतच स्थानिक प्रश्न, सामाजिक विषय, राजकीय घडामोडी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणींना प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे मान्यवरांनी सांगितले.

**पत्रकार भवनासाठी सहकार्य करा; मिलिंद पानसरे यांची मागणी**

यावेळी बोलताना सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या कार्याचे कौतुक केले. सिंहगड, खडकवासला आणि परिसरातील पत्रकारांसाठी सुसज्ज पत्रकार भवनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारांसाठी बैठका, पत्रकार परिषदा, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी पत्रकार भवन उभारणे गरजेचे आहे. पत्रकारिता क्षेत्रातील बांधवांना एकत्रित आणण्यासाठी आणि पत्रकारांच्या विविध उपक्रमांना चालना देण्यासाठी हे भवन महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे पत्रकार भवनाच्या उभारणीसाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, अशी मागणी पानसरे यांनी आमदार भीमराव तापकीर यांच्याकडे केली.

**पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चित प्रयत्न करू : भीमराव तापकीर**

मिलिंद पानसरे यांनी केलेल्या पत्रकार भवनाच्या मागणीची आमदार भीमराव तापकीर यांनी गांभीर्याने दखल घेतली. खडकवासला मतदारसंघातील पत्रकारांसाठी हक्काचे आणि उपयुक्त व्यासपीठ असणे आवश्यक असून, पत्रकार भवन उभारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या चार वर्षांपासून खडकवासला मतदारसंघातील नागरिकांच्या प्रश्नांना दैनिक आरंभपर्वने व्यासपीठ दिले आहे. स्थानिक प्रश्न प्रशासन आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविण्याचे काम माध्यमे करीत असतात. त्यामुळे पत्रकारांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी सहकार्य करणे ही आपली जबाबदारी असल्याचेही तापकीर यांनी नमूद केले. पत्रकार भवनाच्या मागणीला लोकप्रतिनिधींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने उपस्थित पत्रकारांनीही या घोषणेचे स्वागत केले. परिसरातील पत्रकारांसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज जागा उपलब्ध झाल्यास पत्रकार परिषद, बैठका, चर्चासत्रे, सामाजिक उपक्रम तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर एकत्रितपणे काम करण्यास मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. (पुढील पानावर)



# चार वर्षांत वाचकांचा विश्वास संपादन



## पत्रकार भवनाच्या आश्वासनाकडे सर्वांचे लक्ष

वर्धापन दिन सोहळ्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे सिंहगड-खडकवासला परिसरातील पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारण्याचा विषय. पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे यांनी मांडलेल्या मागणीवर आमदार भीमराव तापकीर यांनी सकारात्मक भूमिका घेत पत्रकार भवन उभारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आगामी काळात या मागणीच्या पूर्ततेसाठी कोणती पावले उचलली जातात, याकडे पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे.





**(दै. आरंभ पर्व)**

गेल्या चार वर्षांच्या वाटचालीत दैनिक आरंभपर्वने पुणे शहर, खडकवासला आणि सिंहगड रोड परिसरातील नागरिकांच्या प्रश्नांना सातत्याने प्रसिद्धी दिली. स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचविण्याचे काम वृत्तपत्राच्या माध्यमातून करण्यात आले. त्यामुळे या परिसरातील वाचक आणि नागरिकांशी आरंभपर्वचे नाते अधिक दृढ झाले असल्याचे यावेळी विविध मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

**आकस न ठेवता केलेली पत्रकारिता कौतुकास्पद : नितीन वाघ**

शिवसेनेचे नितीन वाघ यांनीही आरंभपर्वच्या वाटचालीचे कौतुक केले. अत्यंत कमी कालावधीत प्रत्येक घटकाला आपलेसे करण्याचा प्रयत्न आरंभपर्वने केला आहे. कोणाविषयीही आकस न ठेवता आणि नम्रतेने केलेली पत्रकारिता निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

कोणताही विषय दिला तरी त्याला दाद देण्याचे काम

निलेश दमिस्टे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून दैनिक आरंभपर्वची झेप आपण पाहत असल्याचे सांगितले. कोणताही विषय मांडला तरी त्या विषयाला योग्य प्रकारे दाद देण्याचे आणि त्याला प्रसिद्धी देण्याचे काम आरंभपर्वने केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

**सर्व क्षेत्रातील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम : सनी रायकर**

सनी रायकर यांनी या भागातील विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना न्याय देण्याचे काम दैनिक आरंभपर्व करत असल्याचे सांगितले. सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींना आपले कार्य जनतेसमोर मांडण्यासाठी आरंभपर्वने हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी नमूद केले.

**मान्यवरांची मोठी उपस्थिती** : या वर्धापन दिन सोहळ्यास आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक श्रीकांत जगताप, काकासाहेब चव्हाण, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, दैनिक आरंभपर्वच्या संपादिका सुरेखा मते, सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, भाजप मंडळ अध्यक्ष यशवंत लायगुडे, भाजप प्रदेश ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे, भाजप नेते सारंग नवले, प्रशांत मते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, वाचक आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकारिता क्षेत्रातून सिंहगड पत्रकार संघाचे अध्यक्ष मिलिंद पानसरे, लोकमतचे कल्याण आवताडे, सकाळचे निलेश चांदगुडे, सकाळच्या जागृती कुलकर्णी, तरुण भारतचे जयंत जाधव, सी 24 तासचे अमोल उदमले, महाराष्ट्र दर्पणचे ज्ञानेश्वर जाधव, रक्षक जनतेचा चे राजकुमार बनसोडे, मीडिया वर्ल्डचे सुमित आंबेकर, न्यूज इंडियाचे प्रकाश यादव, नागरिकशस्त्र न्यूजचे ज्ञानेश्वर दळवी, डिजिटल पुणेचे गजानन मेनकुदळे, उचित मीडिया सर्विसेसचे जीवराज चोले, अमोल हांडे, पूर्वा हांडे, नीलम कुलकर्णी, वंदना कोर्टिकर, मंजुषा आवळकंठे, दीपाली ढमाले आदी पत्रकार व माध्यम प्रतिनिधी उपस्थित होते.

सामाजिक क्षेत्रातून श्रुफिन फाउंडेशनच्या सविता रासोटे, विजय रासोटे, व्यसनमुक्ती केंद्राचे सुभाष हगवणे, विसावा फाउंडेशनच्या स्वाती पवार, निलेश दमीष्टे, सनी रायकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जनार्दन भोसले तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती. राजकीय क्षेत्रातून आमदार भीमराव तापकीर, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, श्रीकांत जगताप, माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, भाजप नेते सारंग नवले, भाजप प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील परखड, नंदकुमार जगताप, तुषार पोकळे, शहाजी वांजळे आदी मान्यवर उपस्थित होते.

**पाचव्या वर्षात अधिक ताकदीने वाटचाल करण्याचा संकल्प**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक राज शिनारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांनी केले. यावेळी त्यांनी दैनिक आरंभपर्वच्या चार वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला.

चार वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर पाचव्या वर्षात पदार्पण करताना वाचकांचा विश्वास अधिक दृढ करणे, सर्वसामान्यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे आवाज देणे आणि समाजातील प्रत्येक घटकाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्वने आतापर्यंतच्या वाटचालीत मिळविलेला वाचकांचा विश्वास पुढेही कायम ठेवत स्थानिक प्रश्नांना अधिक व्यापक स्वरूपात प्रसिद्धी देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**वाचक, हितचिंतकांचे नाते अधिक दृढ करण्याचे आवाहन**

व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांनी आभार व्यक्त केले. दैनिक आरंभपर्वशी वाचकांचे, हितचिंतकांचे आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचे नाते असेच फुलत राहावे, असे आवाहन त्यांनी केले. आगामी काळातही जनतेच्या प्रश्नांसाठी आरंभपर्व निश्चितपणे व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे यांनी केले. चार वर्षांचा प्रवास पूर्ण करून पाचव्या वर्षात प्रवेश करत असताना आरंभपर्वच्या संपूर्ण टीमने वाचक, हितचिंतक आणि समाजातील विविध घटकांच्या सहकार्याने पुढील वाटचाल अधिक जोमाने करण्याचा संकल्प केला.

























































दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




### मैदानातून थेट रिॲलिटी गेममध्ये; सेहवागचे स्ट्रीमिंगमध्ये पदार्पण

मुंबई (आरंभ पर्व) : क्रिकेटच्या मैदानावर आपल्या आक्रमक फलंदाजीने प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देणारे माजी भारतीय क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग आता एका वेगळ्याच मैदानात उतरणार आहेत. प्राइम व्हिडिओवरील एमएक्स ओरिजिनल रिॲलिटी मालिका 'राइज अँड फॉल' सीझन २चे सूत्रसंचालन सेहवाग करणार असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांचे स्ट्रीमिंग विश्वात पदार्पण होत आहे. बनिजय एशियाची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाची पहिली झलक नुकतीच प्रदर्शित करण्यात आली. निर्भीड फलंदाजी, हजरजबाबीपणा आणि स्पष्टवक्तेपणासाठी ओळखल्या जाणाऱ्या सेहवागची खास शैली कार्यक्रमाच्या प्रोमोमध्ये पाहायला मिळते.



### ॲम्पिअरकडून 'बिल्ट फॉर भारत' इलेक्ट्रिक स्कूटर्सची संपूर्ण श्रेणी सादर

पुणे (आरंभ पर्व) : ग्रीव्हज इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचा ब्रँड ॲम्पिअरने भारतातील दैनंदिन प्रवासाच्या विविध गरजा लक्षात घेऊन आपल्या 'बिल्ट फॉर भारत' या संकल्पनेअंतर्गत इलेक्ट्रिक स्कूटर्सची संपूर्ण श्रेणी पुण्यात सादर केली आहे. या पोर्टफोलिओमध्ये ॲम्पिअर नेक्सस ईएक्स+, मॅग्नस जी मॅक्स, मॅग्नस निओ आणि रिओ व्हाईब यांचा समावेश आहे. कामगिरी, व्यावहारिकता आणि किफायतशीरपणा या विविध गरजांनुसार ग्राहकांना पर्याय उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. पेट्रोल स्कूटरकडून इलेक्ट्रिक स्कूटरकडे वळू इच्छिणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या वापराच्या पद्धती आणि अर्थसंकल्पानुसार योग्य पर्याय निवडता यावा, यासाठी ही श्रेणी सादर करण्यात आली आहे. पोर्टफोलिओमधील ॲम्पिअर नेक्सस ईएक्स+मध्ये ५ किलोवॅट क्षमतेची मोटर देण्यात आली आहे. भारतातील आव्हानात्मक भूप्रदेशांमध्ये नेक्ससने केलेल्या विविध प्रवासांमुळे या व्यासपीठाच्या क्षमतेचे प्रदर्शन झाल्याचे कंपनीने म्हटले आहे.

### एल अँड टी फायनान्स (LTF) ची पाइन लॅब्स सोबत भागीदारी

L&T Finance

पुणे (आरंभ पर्व) : देशातील आघाडीच्या बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (NBFCs) एक असलेल्या एल अँड टी फायनान्स लिमिटेड (LTF) ने, आघाडीची जागतिक पेमेंट्स तंत्रज्ञान कंपनी असलेल्या पाइन लॅब्स लिमिटेडसोबत भागीदारी केल्याची घोषणा केली आहे. ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ मध्ये एल अँड टी फायनान्स प्लॅनेट ॲपमध्ये एजेंटिक स्टोअरफ्रंट समाविष्ट करण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. या सहकार्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता एजंट्सना नियंत्रित चौकटीत सुरक्षितपणे संवाद साधता येईल आणि व्यवहार पूर्ण करता येतील, ज्यामुळे एजेंटिक कॉमर्स सक्षम होईल. या भागीदारीची सुरुवात पहिल्या वापराच्या उदाहरणाच्या रूपात विमान तिकीट बुकिंगपासून होत आहे. यामुळे ग्राहकांशी होणारा संवाद केवळ संवादात्मक चॅटबॉट्सपुरता मर्यादित न राहता, सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्वायत्त पद्धतीने व्यवहार पूर्ण करण्याच्या पातळीवर पोहोचेल. या घडामोडीवर भाष्य करताना, एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अर्बन अनसिक्योर्ड ॲसेट्स, पेमेंट्स अँड डिजिटल पार्टनरशिप्स विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. मनीष कुमार गुप्ता, म्हणाले, "आमच्या ग्राहकांच्या आर्थिक आणि जीवनशैलीशी संबंधित प्रवासांना सुलभ करण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल नवकल्पनांचा वापर करणे हे एल अँड टी फायनान्समधील आमचे नेहमीच उद्दिष्ट राहिले आहे. एल अँड टी फायनान्स प्लॅनेट ॲपवर एजेंटिक स्टोअरफ्रंट सादर करण्यासाठी पाइन लॅब्स सोबत केलेली भागीदारी ही संवादात्मक सहाय्यापासून प्रत्यक्ष व्यवहाराच्या अंमलबजावणीकडे होणारा एक महत्त्वपूर्ण बदल दर्शवते. वापरकर्त्यांनी निश्चित केलेल्या नियंत्रण मर्यादांमध्ये सुरक्षितपणे कार्य करणाऱ्या स्वायत्त कृत्रिम बुद्धिमत्ता एजंट्सच्या माध्यमातून आम्ही अत्यंत वैयक्तिकृत, सुलभ आणि प्रयत्नरहित कॉमर्स व पेमेंट्सचा अनुभव निर्माण करत आहोत. विमान बुकिंग ही केवळ सुरुवात आहे; नजीकच्या भविष्यात ही रचना अनेक व्यापारी श्रेणींमध्ये विस्तारली जाईल."

### जुगार अड्डा आणि अवैध धंद्यांवर खेड पोलीसांचे छापे



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : गणपती उत्सवादरम्यान खेड पोलिसांनी बुधवारी (दि.१६) एकाच दिवशी अनेक ठीकाणी अवैध दारू विक्री आणि अवैध धंद्यावर कारवाई केली. तालुक्यातील कनेरसर, कडधे आणि ठाकुर पिंपरी येथे अवैध दारू विक्रीवर सापळा रचून धाड टाकली, तर राजगुरुनगर शहरात जुगार आणि अवैध धंद्यावर छापा टाकला. गणेशोत्सव काळात झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. खेड तालुक्यातील तीन ठिकाणी नागरीकांच्या तक्रारीवरून अवैध दारू विक्रीचे प्रकार समोर आल्यानंतर, पोलिसांनी गुप्त माहिती जमा केली. त्याच्या आधारे सापळा रचला. कनेरसर, कडधे आणि ठाकुर पिंपरी येथे पोलिसांनी अचानक छापे टाकून अवैध दारू विक्री करणाऱ्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत संबंधित ठिकाणांहून मोठा दारूसाठा जप्त करण्यात आला असून, दारू अड्डा चालविणाऱ्या चौघांना मुद्देमालासह अटक केली आहे. राजगुरुनगर शहरातही भरवस्तीत खेड पोलिसांनी जुगार आणि अवैध धंद्यावर छापा टाकला. गणेशोत्सव काळात शहरात अवैध धंदे आणि जुगार यासारखे प्रकार वाढत असल्याच्या तक्रारींनंतर पोलिसांनी ही कारवाई केली. छाप्यात संबंधित ठिकाणांहून जुगाराशी संबंधीत साहित्य जप्त केले आणि आरोपींविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

# रॅकॉल्डकडून 'प्रोन्टो डार्क ५ लिटर' इन्स्टंट वॉटर हीटर लाँच

## इटालियन डिझाइन, आकर्षक डार्क फिनिश आणि जलद पाणी तापविण्याची क्षमता; आधुनिक घरांसाठी स्टायलिश पर्याय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील प्रीमियम वॉटर हीटिंग ब्रँडपैकी एक असलेल्या रॅकॉल्डने आपल्या इन्स्टंट वॉटर हीटर श्रेणीत 'प्रोन्टो डार्क ५ लिटर' या नव्या उत्पादनाची भर घातली आहे. आधुनिक आणि डिझाइनबाबत जागरूक ग्राहकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या वॉटर हीटरमध्ये इटालियन डिझाइन, आकर्षक ग्लॉसी डार्क फिनिश, स्लीक आणि जागा वाचविणारे स्वरूप तसेच जलद पाणी तापविण्याची क्षमता देण्यात आली आहे.




कॉम्पॅक्ट आकार आणि आकर्षक डार्क फिनिशमुळे प्रोन्टो डार्क आधुनिक बाथरूम तसेच स्वयंपाकघरात सहजपणे बसतो. ५ लिटर क्षमतेसह जलद तापविण्याची क्षमता असल्याने दैनंदिन वापरासाठी आवश्यक सुविधा मिळते. त्यामुळे आधुनिक शहरी घरांसाठी हे उपकरण उपयुक्त ठरण्याचा दावा कंपनीने केला आहे. प्रोन्टो डार्कमध्ये कार्यक्षमतेसोबत सुरक्षिततेवरही भर देण्यात आला आहे. उपकरणामध्ये शॉक-प्रूफ बॉडी, कार्यक्षम थर्मोस्टॅट, थर्मल कट-आउट आणि प्रेशर रिलीफ यंत्रणा यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. यातील १२-बोल्ट प्रणाली उपकरणाला ६.५ बारपर्यंतच्या पाण्याच्या दाबाचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. त्यामुळे उंच इमारतींमधील घरांसाठीही हे उपकरण उपयुक्त ठरण्याचा कंपनीचा दावा आहे.

लॉंचबाबत अरिस्टॅन ग्रुप इंडिया प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आणि देश व्यवस्थापक मोहित नरुला म्हणाले, "ग्राहकांची उपकरणे निवडण्याची पद्धत बदलत आहे. कार्यक्षमता महत्त्वाची असली तरी डिझाइन, सौंदर्यदृष्टी आणि उत्पादन घराच्या वातावरणाशी किती सहजपणे जुळते, यालाही खरेदीच्या निर्णयात वाढते महत्त्व मिळत आहे. प्रोन्टो डार्क ५ लिटरच्या माध्यमातून हा विचार वॉटर हीटिंग श्रेणीत आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. रॅकॉल्डच्या इटालियन डिझाइन परंपरेचा आणि भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजांचा मेळ या उत्पादनातून साधण्यात आला आहे." गेल्या काही वर्षांत वॉटर हीटरकडे प्रामुख्याने कार्यक्षमतेच्या दृष्टीने पाहिले जात होते. मात्र, घरातील उपकरणे आता केवळ उपयोगितेपुरती मर्यादित न राहता घराच्या सौंदर्याचा भागही बनत आहेत. या बदलत्या ग्राहक अपेक्षांचा विचार करून कॉम्पॅक्ट आकार, आकर्षक डिझाइन, जलद तापविण्याची क्षमता आणि सुरक्षा वैशिष्ट्ये यांचा मेळ प्रोन्टो डार्कमध्ये साधण्यात आला आहे.

### डिझाइनवर आधारित डिजिटल मोहीम

या उत्पादनाच्या लाँचसोबत रॅकॉल्डने नवीन डिजिटल व्हिडिओ मोहीमही सादर केली आहे. या मोहिमेत प्रोन्टो डार्कच्या डिझाइन-केंद्रित वैशिष्ट्यांवर भर देण्यात आला आहे. पारंपरिक वॉटर हीटरच्या कार्यक्षमतेपलीकडे जात, आधुनिक जीवनशैलीशी जुळणारे उपकरण म्हणून प्रोन्टो डार्क सादर करण्यात आला आहे.

## एएम/एनएस इंडियाला दोन महत्त्वपूर्ण बीआयएस परवाने

- विशेष पोलाद क्षेत्रातील नेतृत्व मजबूत; आयात प्रतिस्थापनाला मिळणार चालना

**हजीरा-सुरत (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया)ने दोन महत्त्वपूर्ण पोलाद मानकांसाठी भारतीय मानक ब्युरोचे (बीआयएस) परवाने मिळवत विशेष पोलाद निर्मिती क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. आयएस २०६२ (भाग २):२०२६ आणि आयएस १९२१०:२०२५ या मानकांसाठी मिळालेल्या या परवान्यांमुळे देशांतर्गत उच्च दर्जाच्या विशेष पोलाद उत्पादनांची उपलब्धता वाढण्यास तसेच आयात प्रतिस्थापनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. आयएस २०६२ (भाग २):२०२६ या नव्याने लागू झालेल्या मानकासाठी अखिल भारतीय स्तरावरील पहिले बीआयएस परवाना मिळवणारी एएम/एनएस इंडिया ही भारतातील पहिली पोलाद उत्पादक कंपनी ठरली आहे. या मानकात हॉट रोल्ड क्वेन्च्ड अँड टेम्पर्ड (क्यू अँड टी) पोलादाच्या प्लेट्स, शीट्स, स्ट्रिप्स आणि वाइड फ्लॅट्सचा समावेश आहे. यासोबतच कंपनीने आयएस १९२१०:२०२५ अंतर्गत प्री-पेंटेड झिंक- ॲल्युमिनियम- मॅग्नेशियम मिश्रधातूचे कोटिंग असलेल्या पोलादाच्या स्ट्रिप आणि शीटसाठीही बीआयएस परवाना मिळवला आहे.

## होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' स्पर्धेत तेजश्री संदीप भूमकर विजेत्या!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सन्मित्र तरुण मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' या स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विविध मनोरंजक खेळ आणि स्पर्धांमध्ये सहभागी होत महिलांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला. या स्पर्धेच्या विजेत्या तेजश्री संदीप भूमकर ठरल्या.

सन्मित्र तरुण मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळात महिला भगिनी तसेच लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून यंदा 'होम मिनिस्टर - खेळ पैठणीचा' या



स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत विविध खेळांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धेचे सूत्रसंचालन पत्रकार ज्ञानेश्वर अण्णा दळवी यांनी केले. त्यांच्या उत्स्फूर्त निवेदनामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धेच्या विजेत्या तेजश्री भूमकर यांना पैठणीचे पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेसाठी मयूर भूमकर, शर्वरी साडी सेंटरचे मालक यांच्या वतीने पैठणी उपलब्ध करून देण्यात आली होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सन्मित्र तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष प्रतीक भूमकर यांनी उपस्थित महिला भगिनी, मान्यवर, स्पर्धक आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. महिलांच्या कलागुणांना आणि सहभागाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

## पंचनामा न झाल्याने सारोळ्यातील शेतकऱ्याने सोयाबीन पेटवले

- प्रशासनाच्या दिरंगाईवर संताप
- पावसाअभावी उभे पीक होरपळले
- तहसीलदारांनी तातडीने पंचनामा करून मदत द्यावी, शेतकऱ्यांची मागणी

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील सारोळे येथील शेतकरी प्रमोद नवनाथ चौधरी यांच्या गट क्रमांक २९५ मधील सोयाबीन पिकाला पावसाने पाठ फिरवल्याने मोठा फटका बसला आहे. गेल्या महिनाभरापासून पाऊस न झाल्याने उभे सोयाबीन पीक अक्षरशः होरपळून गेले आहे. मात्र,



पिकाचे मोठे नुकसान होऊनही अद्याप पंचनामा करण्यात आलेला नसल्याची तक्रार शेतकरी चौधरी यांनी केली आहे. पावसाअभावी सोयाबीनचे पीक हातचे गेले असताना प्रशासनाकडून पंचनामा होण्याची प्रतीक्षा करूनही कार्यवाही न झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. अखेर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि आपल्या नुकसानीची तीव्रता दाखवण्यासाठी प्रमोद चौधरी यांनी आपल्या शेतातील सोयाबीन पीक पेटवून दिले. "पीक जळून खाक झाल्यानंतरही पंचनामा होत नसेल तर शेतकऱ्याने दाद मागायची कुठे?" असा सवाल या घटनेनंतर उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, संबंधित प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन शेतात प्रत्यक्ष पाहणी करावी आणि नियमानुसार नुकसानीचा पंचनामा करावा, अशी मागणी होत आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार आर्थिक मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असताना प्रशासनाने पंचनाम्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास आगामी काळात शेतकरी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. आता तहसील प्रशासन या घटनेची कितपत दखल घेते आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा दिलासा मिळतो का, याकडे सारोळे परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## रेल्वे तिकीटांच्या काळ्या खेळावर विनोदाची फोडणी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

रेल्वेचे तिकीट मिळवण्यासाठी प्रतीक्षा यादीत अडकण्याचा अनुभव भारतीय प्रवाशांसाठी नवा नाही. मात्र, याच रोजच्या समस्येचे रूपांतर एखाद्या मोठ्या घोटाळ्यात झाले तर? जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि जार पिक्चर्स निर्मित 'वेटिंग है' या एमएक्स ओरिजिनल मालिकेची कथा याच कल्पनेभोवती फिरते. मालिकेचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, १६ सप्टेंबर २०२६पासून ही मालिका प्राइम व्हिडिओवर विनामूल्य पाहता येणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक समीर विद्वांस यांनी दिग्दर्शित



केलेल्या या मालिकेत दिव्येंदु आणि भुवन अरोरा प्रमुख भूमिकेत आहेत. त्यांच्यासोबत हर्षिता गौर, कुमुद मिश्रा, विजय मौर्य, सृष्टि तारे आणि सुनीता राजवार यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. ज्योती देशपांडे आणि अजय राय यांनी मालिकेची निर्मिती केली आहे. मालिकेच्या केंद्रस्थानी आहे सुगम मिश्रा, ही भूमिका दिव्येंदु यांनी साकारली आहे. रेल्वे कॉन्स्टेबल असलेला सुगम आपल्या नव्या नोकरीत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतानाच त्याला रेल्वे तिकिट आरक्षणातील काहीतरी गडबड जाणवते.




## योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे

- उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन
- कैवल्यधामच्या गोरधनदास सेक्सारिया कॉलेज ऑफ योग अँड कल्चरल सिंथेसिसचा अमृत महोत्सव उत्साहात

**लोणावळा (दै. आरंभ पर्व)**

"भूतकाळातील चांगल्या प्रथा आणि परंपरा भावी पिढ्यांसाठी जतन केल्या पाहिजेत. व्यक्तीच्या अंतर्मनातील संतुलन आणि जगाशी सुसंवाद साधण्याची शिकवण देणारा योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे," असे प्रतिपादन भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. कैवल्यधामच्या गोरधनदास सेक्सारिया कॉलेज ऑफ योग अँड कल्चरल सिंथेसिसच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित अमृत महोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. योग शिक्षण, संशोधन आणि योग शिक्षक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात महाविद्यालयाने दिलेल्या ७५ वर्षांच्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. उपराष्ट्रपती राधाकृष्णन म्हणाले, "बदल हा निरंतर होत असतो. मात्र, भूतकाळातील सर्व चांगल्या प्रथा भविष्याच्या पिढ्यांसाठी जतन करणेही आवश्यक आहे. त्या अर्थाने योग केवळ एका पिढीपुरता मर्यादित नाही. योग मानवतेच्या संपूर्ण आयुष्यभर टिकून राहिला पाहिजे. व्यक्तीच्या अंतर्मनातील संतुलन आणि जगाशी सुसंवाद शिकवणारी योगाची भावना येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनाला सातत्याने प्रकाशमान करत राहो." या सोहळ्याला महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, सेक्सारिया कुटुंबीय, कैवल्यधामचे पदाधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि हितचिंतक उपस्थित होते. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी कैवल्यधामचे कौतुक करताना ही संस्था देशाचा अभिमान असल्याचे सांगितले. जगभरात योगाची लोकप्रियता वाढत असताना त्याच्या अस्सल आणि वैज्ञानिक स्वरूपाचे जतन करण्याची जबाबदारीही वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# भीमाशंकर ज्योतिर्लिंग येथे सुमीत फॅसिलिटीजकडून भीमा नदीच्या पवित्र उगमस्थळाची स्वच्छता

- दररोज ३०-३५ कचरापेट्यांमधील कचरा, प्लास्टिक आणि निर्माल्याचे संकलन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुमीत फॅसिलिटीजने पुणे जिल्ह्यातील श्री भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर परिसर येथे विशेष 'स्वच्छता सप्ताह' राबवला. २ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत,श्रावण महिन्याच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

सुमीत फॅसिलिटीजने स्वतः पुढाकार घेत ही स्वच्छता मोहीम सातत्याने राबवली. भीमा नदीच्या उगमस्थळासह मंदिर परिसरातून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाची विशेष स्वच्छता करण्यात आली. उगमस्थळी साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा आणि भाविकांकडून अर्पण करण्यात आलेले निर्माल्य काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. या मोहिमेसाठी २५ ते ३० सफाई कर्मचारी आणि ३ पर्यवेक्षक, तसेच स्वतंत्र देखरेख वाहन, कचरापेट्या, झाडू व इतर स्वच्छता साहित्य, कचऱ्याच्या पिशव्या आणि वैयक्तिक सुरक्षा साधने (PPE



किट्स) उपलब्ध करून देण्यात आली. मोहिमेदरम्यान कचरा व प्लास्टिक संकलन, मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांची आणि परिसराची स्वच्छता, कचऱ्याची विल्हेवाट तसेच नाल्यांची स्वच्छता अशी विविध कामे करण्यात आली.

श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात कचरा जमा होत होता. सुमीत फॅसिलिटीजच्या पथकाने दररोज ३० ते ३५ कचरापेट्यांमधील कचरा, प्लास्टिक आणि निर्माल्याचे संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्याचे काम केले. मुंबईतील जुहू आणि वरळी समुद्रकिनाऱ्यांवरील स्वच्छता उपक्रमानंतर सुमीत फॅसिलिटीजने भीमाशंकर येथेही स्वच्छता मोहीम राबवली. महाराष्ट्रातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर तीर्थक्षेत्रात स्वच्छता आणि सार्वजनिक सेवेसाठी सुमीत फॅसिलिटीजने पुढाकार घेतला.

सुमीत ग्रुप एंटरप्रायझेसचे कार्यकारी अध्यक्ष श्री. सुमित साळुंके म्हणाले, "भीमाशंकर हे केवळ आध्यात्मिक महत्त्व असलेले तीर्थक्षेत्र नाही, तर याच ठिकाणाहून भीमा नदीचा प्रवास सुरू होतो. त्यामुळे या पवित्र स्थळाची आणि जीवनदायी नदीच्या उगमाची काळजी घेणे, ही आमच्यासाठी खरी सेवा आहे. आमची ही स्वच्छता मोहीम केवळ कचरा हटवण्यापुरती मर्यादित नव्हती, तर श्रद्धा, पर्यावरण आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या सामूहिक जबाबदारीचा आदर व्यक्त करण्याचा हा एक प्रयत्न होता. सुमीत ग्रुपमध्ये स्वच्छता हीदेखील सेवेचेच एक रूप मानले जाते, म्हणजेच स्वतःपेक्षा मोठ्या गोष्टीची निःस्वार्थपणे काळजी घेणे. भीमाशंकर येथे केलेल्या आमच्या याप्रयत्नातून अधिक जागरूकता निर्माण होईल आणि आपल्या धार्मिक स्थळांसोबतच नैसर्गिक वारशाचे स्वच्छता व संरक्षण करण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळेल, अशी आम्हाला आशा आहे." सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस ही भारतातील बिझनेस सर्व्हिसेस क्षेत्रातील आघाडीची कंपनी असून, देशातील २० हून अधिक राज्यांमध्ये तिचे कार्यक्षेत्र आहे आणि ५०,००० हून अधिक कर्मचाऱ्यांचा समूह आहे. समूह फॅसिलिटीज मॅनेजमेंट, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा सेवा आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा यांसह विविध क्षेत्रांमध्ये सेवा प्रदान करतो.